

# चोर पोलिस व्हीबीएस



## पुढा-यांचे हस्तपुस्तक

सर्व वयोगटांसाठी

# प्रिय शिक्षकांनो

“चोर पोलिस” या सुट्टीतील पवित्र तुमचे स्वागत आहे.
तुम्ही तुमची पोलिसाची टोपी आणि धावण्याचे बूट घालून चोराचा पाठलाग करण्यासाठी तयार आहात काय? तुम्ही अंदाज लावला असेल! तुमच्या चर्चला वाडया सारखे सजविण्याची वेळ आहे, पोलिसाचे बिल्ले किंवा भिंतीवर तारे लावा आणि पाठलाग करणारे संगीत स्पीकरवर लावा.
ह्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेचा केंद्र बिंदू सुवार्ता प्रसार आहे. तुमचे विद्यार्थी दररोज घरी तयार केलेल्या रंगीत मातीसह येशू ख्रिस्ताच्या जीवनातून शिकतील. आठवडा भरात ते रोमकरांस पत्र या पुस्तकातील मुख्य पाच शास्त्र वचनातून देवाच्या तारणाच्या योजने बद्दल शिकतील. विद्यार्थी हे शिकतील की देव प्रत्येकाला पाहतो आणि लोक जे विचार करतात, बोलतात, किंवा वागतात त्या सर्व वाईट गोष्टी जाणतो. येशूने लोक ज्या वाईट गोष्टी करतात त्याच्यासाठी शिक्षा भोगण्याची निवड केली. त्याचा पूर्ण झालेला त्याग हा ऐच्छिक आहे आणि त्याची निवड करणे किंवा न करणे हे लोकांच्या निवडीवर अवलंबून आहे. मुलांनी येशूला त्यांची क्षमा करण्याची विनंती करावी व त्यांची शिक्षा त्याने स्वतःवर घेतली म्हणून त्याचे आभार मानून ते आयुष्य भर त्याचे अनुसरण करतील असे देवाला सांगावे असे मुलांना सांगा. तुम्ही मुलांना प्रोत्साहित करू शकता की जी चांगली बातमी ते व्हीबीएस मध्ये शिकले ती ते त्यांच्या ओळखीच्या लोकंपर्यत पोहचविणारे संदेश वाहक बनू शकतात.
प्रत्येक धड्यासोबत एक सुपर-मजेदार नाटक किंवा स्किट दिले जाते जे तुमच्या सुट्टीतील बायबल शाळेची दररोज हसत-खेळत सुरुवात करेल. तुमच्या वेशभूषेतील तुमचे कलाकार तुमच्या व्हीबीएस  मध्ये तुमच्या विद्यार्थ्यांशी नाते निर्माण करण्यासाठी सर्वत्र उत्तम मदतनीस ठरू शकतात. त्यांना एका भागातून दुसऱ्या भागात जातांना पाहून तुमच्या विद्यार्थ्यांना त्या दिवसाचा संदेश लक्षात ठेवण्यास मदत होईल.
तुरुंग, पोलिसांची गाडी आणि वाडा अशी सजावट करणे सोपे होईल. तुमच्या चर्चच्या स्टेजसाठी तुमच्या स्वतःच्या वाड्याच्या दृश्यांची पार्श्वभूमी निवडून तुम्ही सजावटीचे काम आणखी सोपे करू शकता. (किंवा तुम्ही ते आमच्या वेबसाइटवरून डाऊनलोड करू शकता आणि ते तुमच्या शहरात छापून घेऊ शकता!) अतिरिक्त मनोरंजनासाठी, तुमच्या चर्चमधील सर्व जण तुमच्या नंतर काही कँडी किंवा दुपारचे जेवण घेऊ शकतील अशी बेकरी तयार करण्यास विसरू नका. सुट्टीतील बायबल शाळा
मुले स्वतः पवित्र शास्त्रातील लोक आहेत असे समजण्यासाठी त्यांना आव्हान मिळेल आणि ते काय करण्याची निवड करतील यासाठी मतदान देण्यासाठी सुध्दा. त्यांच्या हस्तपत्रिकेतील कोडे सोडविणे, मातीसोबत पवित्र शास्त्रातील गोष्टींची उजळणी करणे, आणि मजेदार खेळासह पाठांतर वचन पाठ करणे त्यांना आवडेल. तेथून ते हस्तकलेकडे वळतील जिथे ते घरी नेण्यासाठी दररोज नविन हस्तकार्य तयार करण्यात हात मळवतील. खेळ देखील आवडता असेल कारण मुलांना नेहमीच स्पर्धा आवडते. प्रत्येक संघाच्या रंगीत रूमाल किंवा रिबीनसह प्रत्येक संघाला ओळखणे सोपे होईल. रसाळ व रूचकर फराळासाठी फराळाच्या टेबलजवळ थांबणे लोक विसरणार नाहीत.
सुवार्ता सांगण्यासाठी ही संधी घ्या कारण लोकांनी शुभवर्तमान ऐकण्याची गरज आहे! जर कोणी सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा घेतली नाही तर ते कसे ऐकतील? ज्याच्या बद्दल त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? आणि कोणी त्यांना संदेश सांगितल्या वाचून ते कसे ऐकतील?
रोम 10;14ब
आम्ही तुमच्यासाठी व तुमच्या संपूर्ण संघासाठी प्रार्थना करीत आहोत. मजा करा. देव तुमच्या बरोबर आहे.

देव तुम्हाला आर्शिवाद देवो,
विकी कंगास



Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत

# ध्येय वचन

परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की,
आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.
रोमकरांस पत्र 5:8


प्रस्तावना ---------- 1
दृष्टिक्षेप ---------- 3
हे साहित्य कसे वापरावे ---------- 4
स्थानकं ---------- 8
अतिरिक्त बोनस ---------- 11
सजावट ---------- 12
धडा 1:पाहिजे ---------- 15
धडा 2: तुरूंगात टाकले ---------- 24
धडा 3: सोडविले ---------- 32
धडा 4 शिक्का मारला ---------- 40
धडा 5: नियुक्ती ---------- 48
खेळाची वेळ ---------- 57
बक्षीसे ---------- 61




# दृष्टीक्षेप

## 1 पाहिजे

मत्तयाला बोलाविले
रोमकरांस पत्र 3:23
फराळ: विशेष काकडी चाट
हस्तकला: पोलिस रेडिओ




## 2 तुरूंगात टाकले

स्त्रीला व्यभिचार करतांना पकडले
रोमकरांस पत्र 6: 23
जेम्स कपकेक
हस्तकला: दाराचे लटकन





## 3 सोडविले

येशू वधस्तंभावर मरण पावला
रोमकरांस पत्र 5:8
फराळ: छोटे सॅन्डविच
हस्तकला: पोलिस गाडी




## 4 शिक्का मारला

जक्कय झाडावर चढतो
रोमकरांस पत्र 10:9
फराळ: फळांचे कबाब
हस्तकला: दुर्बीण




## 5 नियुक्ती

शिष्य माणसे धरणारे होतात
रोमकरांस पत्र 10: 14
फराळ: भेळ
हस्तकला: 1. राजेशाही मुकुट




# हे साहित्य कसे वापरावे

## आमंत्रण कसे द्यावे




जाहिरात संच पाहा!

ब-याच मंडळयांनी त्यांच्या समाजाला सुट्टीतील शास्त्र शिक्षण शाळेला आमंत्रित करणे सुरू केले म्हणून ते उत्साही आहेत. कल्पना ही आहे की तुमच्या सर्व शिक्षकांना चोर पोलीस वेशात तयार करून त्यांना आमंत्रण किंवा चॉकलेट देत रस्त्याने मिरवणूक काढावी. काही मंडळया वाहने सजवितात ह्यासाठी की मिरवणूकीत चालवावी.

सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळ  आमंत्रण देण्यासाठी सर्वात सहज मार्ग म्हणजे तुमच्या स्थानिक किराणा दुकानांवर किंवा मेट्रोवर फलक लावणे. तुम्ही सार्वजनिक ठिकाणी उभे राहून पत्रकंही वाटू शकता.

आमंत्रण देण्याच्या उद्देशासाठी, आपल्याकडे पूर्ण रंगाचे आमंत्रण फलक आहे (11 x 17 इंच), दोन रंगांचे आमंत्रण फलक (11 x 17 इंच) आणि लहान फलक (5.5 x 8.5 इंच) आमच्या वेबसाईटवर डाउनलोड करण्यासाठी व छापण्यासाठी ते उपलब्ध आहेत.

तुमच्या स्वतःच्या मंडळीला आमंत्रण मोहिमेत सहभागी करण्यास, व सर्वांना  हे सांगण्यास की विशेष कार्यक्रम लवकरच येत आहे विसरू नका. तुम्ही तुमच्या मंडळीतील प्रत्येक कुटुंबाला पाच पत्रकं देऊ शकता आणि त्यांना त्यांच्या शेजा-यांना सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेला आमंत्रित करायला सांगा.

पोस्टकार्ड, आमंत्रण फलक, छापलेले टी शर्ट, किंवा दारावरील लटकनं तयार करण्यासाठी मुख्य लोगो, हस्तकार्य, चित्र हे आमच्या बेवसाइट वर उपलब्ध आहेत.

पूर्णपणे बाहेर जा! मुलांनी सुर्वाता ऐकणे आवश्यक आहे, आणि तसे घडण्यासाठी तुमचे सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा  परीपूर्ण जागा आहे.

## स्वयंसेवक निवडणे

म्ही शिफारस करतो की तुम्ही तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेमध्ये प्रत्येक कामासाठी लागणारे विशिष्ट स्वयंसेवक नेमावे. उदा. तुम्हाला तीन अभिनेत्यांची गरज राहिल जे दर आठवडयात मंचावर केवळ मजेदार अभिनय करण्यासाठी तयार असतील एवढेच नाही तर तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेमध्ये दिवसभर फिरतील आणि मुलांना अलिंगन देतील. उपहारगृह चालविण्यासाठी लागणा-या कौशल्या पेक्षा ह्यासाठी वेगळे कौशल्य लागतील.

तुमच्या व्ही बी एस साठी काही महिन्या अगोदरच जाहिरात करणे सुरू करा, संपूर्ण मंडळीला येणा-या कार्यक्रमासाठी उत्साहित करा. परंतू जेव्हा प्रत्येक व्यक्तिची नेमणूक करण्याची वेळ येईल तेव्हा आम्ही शिफारस करतो की तुम्ही आवश्यक कामाची यादी करावी आणि प्रत्येक कार्य कोण चांगले करेल अशा लोकांचा विचार करावा. त्यानंतर प्रत्येक व्यक्तिला कामाच्या संधीसह भेटावे. एक कल्पना अशी आहे की त्यांना सर्व कार्य असलेल्या यादीवर सही करायला लावणे, जेणे करून इतर पाहतील की मदत करण्यासाठी कोण तयार आहे. जे पुरूष "होय" म्हणतील त्यांनी तुम्ही सुरू करू शकता जेणे करून इतर पुरूष सहभागी होत आहेत हे पुरूषांना कळेल आणि ते सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित होतील. कुठल्याही विभागात लोकांचे दान व कौशल्य ह्यांच्या आधारे त्यांना निवडावे.


काही लोकांना मुलांच्या सेवेची सवय नाही, परंतू जेव्हा तुम्ही त्यांना विशिष्ट कामासाठी विचाराल तेव्हा ते काम करण्यासाठी तयार होतील. सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेमध्ये भाग घेणे हे तुमच्या मंडळीला हे दाखवून देणे असू शकते की मुलांच्या सेवेत काम करणे किती मजेदार असू शकते! मुलांच्या सेवेचे सर्व कार्यकारी शिक्षक नसतात. आपल्याला पुढील पिढी तयार करण्यासाठी ख्रिस्ताच्या संपूर्ण शरीराने सहभागी होण्याची गरज आहे.

# शिक्षक नेमणे

मुलांबरोबर विविध विभागात प्रवास करण्यासाठी तुम्ही भरपूर मदतनीस नेमावे अशी आम्ही शिफारस करतो. त्यांना वर्गाची तयारी किंवा काही शिकविण्याची गरज नाही. त्यांचे मुख्य काम हे राहिल की मुलांची नावे पाठ करावी आणि त्यांना विविध कार्यासाठी इकडे तिकडे हालवावे. तुम्ही सारख्या वयाच्या मुलांचा लहान गट तयार करून त्यांना छोटा गट पुढारीही देऊ शकता. पाच ते दहा मुलांच्या गटाची आम्ही शिफारस करतो.
तुमची बाकी नेमणूक ही विशिष्ट कार्यासाठी आहे: जी व्यक्ति मुख्य शिक्षण देईल, जी व्यक्ति प्रत्येक स्थानक चालवेल, अभिनेते, नृत्य संघ, आणि प्रत्येक रंगाच्या संघाचा कर्णधार किंवा पुढारी.
मॅन्युअल ऑनलाइन उपलब्ध असल्याने, आम्ही शिफारस करतो की तुम्ही प्रत्येक केंद्राच्या पुढाऱ्याने त्यांच्या फोनवर त्यांच्या सूचना सहजपणे पहाव्या. उदाहरणार्थ, फराळ पुढारी त्यांच्या सेल फोनवर प्रत्येक दिवसासाठी फराळासाठी निर्देश आणि पाककृती शोधू शकतात. खेळ डायरेक्टर खेळाच्या कल्पना आणि सूचना ऑनलाइन शोधू शकतात. तुमच्या संघासाठी हे शक्य नसल्यास, तुम्ही त्यांना देण्यासाठी त्यांच्या विशिष्ट पृष्ठाची एक प्रत बनवू शकता जेणेकरून ते त्यांच्या भागाची तयारी करू शकतील.

# भ्रमण सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा

हे सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा अशी  लिहिण्यात आली आहे की तीन स्थानकांवर परिभ्रमण किंवा अदलाबदली करावी. ह्याचा अर्थ हा आहे की तुम्ही तुमच्या गटाला तीन गटात विभागावे आणि ते गट दिलेल्या तीन स्थानकांवर अदलाबदली करतील. प्रत्येक स्थानक तीस मिनिटांचा असेल आणि प्रत्येक स्थानकाची तीनदा पुनरावृत्ती होईल जेणे करून प्रत्येक गट दररोज प्रत्येक स्थानकावर एकदा जाईल.
तुम्ही तुमच्या गटाला तुम्हाला पहिजे तसे विभागू शकता, परंतू आम्ही शिफारस करतो की तुम्ही त्यांना वयानुसार विभागावे. ह्याचा अर्थ हा आहे की प्रत्येक गट सारखा असणार नाही. परंतू हे कर्मचा-यांसाठी विशिष्ट वयाच्या गटासाठी प्रत्येक स्थानक हाताळणे सोपे करील. तुम्ही नेहमी ज्या वयानुसार विभागनी करता ते तुम्ही करू शकता किंवा जे आम्ही आपल्या विद्यार्थी पुस्तकांसाठी नेमले आहे ते वापरू शकता.
सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेसाठी आमचे विद्यार्थी पुस्तक ह्या तीन वयोगटात विभागले आहेत:
"सोपे " 4-6 वर्ष
"मध्यम " 7-9 वर्ष
"कठीण" 10-12 वर्ष
"प्रगत" 13-15 वर्ष



# सुरवात

स्तुती आराधना:

तुमच्या व्ही बी एस ची सुरवात कृतीसह काही मजेदार संगीताने करा. आम्ही शिफारस करतो की काही तरूण मुलांचा गट तयार करा जो वेळे आधी सराव करू शकेल आणि गीतांसाठी सर्व कृती शिकेल. त्यांना चोर पोलीसच्या शैलीत तयार होवू द्या आणि तुम्ही स्वतः दररोज मजेदार रित्या सुरवात कराल.

नाटक स्कीट

संगीत संपल्यावर, नाटक/ लघूनाटिका येते, जे खूप हसविते. तुम्ही आधीच तीन अभिनेते ठरवा जे चोर पोलिसचा अभिनय करतील आणि त्यांना दररोजच्या नाटकाचा सराव करू द्या. अनेक मंडळया पोषाकासह खूपच समाविष्ट होतात, सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा अधिक मजेदार करण्यासाठी.

पवित्र शास्त्रातील धडा:

नाटकानंतर मुख्य शिक्षण आहे. तुमच्या विद्यार्थी एकत्र तुमच्या मुख्य खोलीत बसतात. या विशेष सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेची पवित्र शास्त्रातील गोष्ट व लागुकरण सांगा.

प्रार्थना:

मुख्य धडयाचा शेवटचा भाग आहे प्रार्थनेची वेळ. हे पार्श्वभूमित मंद संगीत सुरू ठेवून उत्तम रित्या करता येईल. दिवसाचे मुख्य ध्येय सांगू शकता, देवाला ते स्पष्ट करण्याची मदत मागून.

सुरवातीचे सत्र ह्याने बंद होते. ह्या सुरवातीच्या सत्राची वेळ संगीतासाठी 12 मिनिट, नाटकासाठी 8 मिनिट, बोलण्यासाठी 7 मिनिट, आणि प्रार्थनेसाठी 3 मिनिट अशी असू शकते.

जेव्हा तुम्ही समाप्त कराल तेव्हा काही उत्साहवर्धक संगीत लावा जेव्हा  मुलं त्यांच्या संघात जातील.

| संगीताने | नाटक | बोलणे | प्रार्थना |
|---|---|---|---|
| **12** | **8** | **7** | **3** |



# संघाची वेळ

तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत स्पर्धा मजेचा भाग असू शकते, परंतू ते पूर्णपणे ऐच्छिक आहे. गट सारखे होण्यासाठी प्रत्येक वयोगटाला चार गटात विभागा. प्रत्येक मूल कोणत्या संघाचा भाग आहे हे दर्शविण्यासाठी बंडाना किंवा रंगीत स्कार्फ सोपा उपाय आहे. उदा. तुम्ही निळा संघ, लाल संघ, पिवळा अणि हिरवा संघ ठेवू शकता. प्रत्येक संघाला कल्पक मजेदार नाव द्या. प्रत्येक वयोगटात असे मुलं राहतील जे चार रंगाच्या प्रत्येक गटाचे भाग होते. तसेच प्रत्येक चार संघात सर्व वयोगटाचे मूले असतील.

प्रत्येक संघाचे नेतृत्व करण्यासाठी पुढारी नेमा. दर दिवशी सुरवातीचे सत्र झाल्यावर ते 5-10 मिनिट घेवू शकतात त्यांचे "उत्साह" तयार करण्यासाठी आणि शांत फेरीसाठी. ते एकत्र प्रार्थना करू शकतात आणि जिंकण्यासाठी रणनीती बद्दल बोलू शकतात. आम्ही शिफारस करतो की तुम्ही हे संघ तुमच्या मुख्य खोलीत, चार कोप-यात वेगवेगळे असे ठेवावे, एकमेकांचा सराव ऐकू येण्यासाठी. ह्या मूळे अधिक उर्जा निर्माण होईल. ही वेळ 5-10 मिनिट असावी त्यांना त्यांच्या स्थानकांकडे जाण्यासाठी सांगायला शिट्टी मारणे किंवा संगीत वाजवे पर्यंत.

दिवसाच्या शेवटी, शेवटच्या कार्यक्रमासाठी आपण चार संघाचे पुढारी मंचावर आणू. त्यांना त्यांच्या संघाचा उत्साह किंवा घोष वारा सांगू द्या आणि मग कोणता संघ गुणात पुढे आहे ते घोषित करा. मोठ्या फलकावर प्रत्येक संघाचे गुण नोंदवा.

गुण देण्यासाठी सर्वात सोपे क्षेत्र म्हणजे "चोर पोलिस खेळ". परंतू तुम्ही शिक्षकांना नोंदी ठेवायला सांगू शकता की कोणता विद्यार्थी चांगला वागला, स्वच्छतेसाठी मदत केली, इतरांशी द्या ळूपणे वागला किंवा लहान विद्यार्थ्यांना मदत केली.
आठवडयाच्या शेवटी जो संघ जिंकेल त्यासाठी काही बक्षीस तयार करा!

## चार संघासाठी चार रंगाचे रंगीत स्कार्फ (किंवा रिबीन)



# स्थानकं

स्थानकं खरोखर मजेदार असू शकतात. आमचा आवडता मार्ग म्हणजे स्थानकांची अदलाबदली करण्याच्या वेळेस संगीत वाजविणे, जेणे करून मुलं एका स्थानकावरून दुस-या स्थानकावर अदलाबदली करत असतांना भरपूर उर्जा राहिल.
प्रत्येक स्थानकासाठी पुरस्कृत वेळ 30 मिनिट आहे.
स्थानकांसाठी मुलांना वेगळे करण्यासाठी त्यांना वयानुसार वेगळे करणे सोपे आहे. मायक्रोफोनने वयानुसार घोषणा करा आणि ते कोणत्या स्थानकांने सुरवात करतील ते सांगा. त्यांना दररोज त्याच जागे वरून सुरवात करू द्या, जेणे करू दुस-या दिवसा पर्यंत ते त्यांना पाठ होईल!

## तुमचे स्थानक सजवा

किल्ले, पोलिस किंवा चोराच्या वस्तू याबद्दल सर्जनशील असा. तुमच्या खेळाच्या जागेवर देखरेख करण्यासाठी तूम्ही कागदाचा चोर तयार करू शकता, आणि जिथे फराळ दिला जाईल तिथे राणी. राजा पवित्र शास्त्रातील गोष्ट किंवा विद्यार्थी पुस्तक कृती भागात शोभेल.

## वर्गापुर्वीची तयारी

मुलं येण्याआधी, त्या दिवसासाठी मत देण्याचे फलक लावा. प्रत्येक वयोगटाने पवित्र शास्त्रातील गोष्टी संबंधी दिलेल्या मताला झाकण्यासाठी कोरा कागद आणि टेप तयार करा. ध्येय हे आहे की प्रत्येक गटाने स्वत: निर्णय घ्यावा आणि आधीच्या गटाच्या मतानुसार प्रभावित होऊ नये. मुलांच्या कार्यकागदांवर काम करण्यासाठी पेन्सिल किंवा रंगकांडया तयार ठेवा. पाठांतर वचनासाठी जे साहित्य वापरण्याची तुम्ही योजना करता ते तयार करा. जर तुम्ही मधून मधून विजेत्यांसाठी बक्षीसं योजले तर मुलांना अधिक मजा येईल.



## वर्गाची वेळ

( तुमच्या भ्रमणातील पहिले स्थानक नसू शकेल)

## पहिली कृतीः मतदान

जेव्हा विद्यार्थी आत येतील, तेव्हा त्यांना मतदानाच्या फलकाभोवती गोळा करा आणि प्रश्नाची ओळख आणि दोन पर्याय सांगा. पवित्र शास्त्रातील गोष्टीबद्दल चर्चा करण्यासाठी आणि तिथं असणे कसे असेल ह्यासाठी काही मिनिटं द्या. विद्यार्थ्यांनी कोणत्या निवडी केल्या त्याची चर्चा करा. प्रत्येक मूल फलकावर त्यांच्या वयोगटानुसार सही किंवा चिन्ह करेल, हे निवडत की त्यांनी काय केले असते किंवा जेव्हा गोष्ट घडली तेव्हा त्यांचे काय मत असते. (मत देण्यासाठी जर तुम्ही निवडले तर ते स्टीकर सुध्दा वापरू शकतात.) पूर्ण झालेले फलक तुम्ही सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा पुढा-याला देऊ शकता हे मुलांना हे दाखविण्यासाठी की प्रत्येकाने कसे मत दिले आणि कोणत्या पर्यायाला सर्वात अधिक मतं मिळाली. हे समाप्ति गट वेळेचा भाग होऊ शकते पवित्र शास्त्रातील गोष्ट पुन्हा सांगण्यासाठी आणि ती व्यक्तिगत करण्यासाठी.

## दुसरी कृती

पुढे, विद्यार्थी त्यांचे कार्यपुस्तिका पूर्ण करायला बसतील. पुस्तकांच्या 4 स्तर आहेत, त्यामुळे त्यांच्या वयाच्या पातळीनुसार त्यांना योग्य पुस्तक देण्याची खात्री करा. जे लहान विद्यार्थी वाचू शकत नाहीत ते रंगीत पानांचा आनंद घेतील. मोठ्या विद्यार्थ्यांना क्लिष्ट चक्रव्यूह आणि शब्द शोधण्यात खूप मजा येईल. तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके छापू शकता किंवा प्रत्येक दिवसासाठी फक्त पानाची फोटोकॉपी करू शकता आणि प्रत्येक दिवसासाठी पाठ पत्रक पास करू शकता.

मोठ्या विद्यार्थ्यांच्या कार्यापुस्तीके मध्ये कार्यशील चर्चा प्रश्न असतात. मुले येण्याआधी त्याचा अभ्यास करणे सुनिश्चित करा आणि ते त्यावर काम करत असताना ज्वलंत चर्चेसाठी खुले राहा.

# मातीसह पवित्र शास्त्राची उजळणी

**(तुमच्या भ्रमणातील हे पहिले स्तानक नसेल)**

(तुमच्या भ्रमणातील हे पहिले स्तानक नसेल) ह्या वर्षाच्या मुख्य धडयात खूप मजा येईल जेव्हा मुलं खेळण्याचे मातीने त्यांचे हात भरवतील! गोंधळ घालविण्याची चिंता करू नका कारण सर्वकाही स्वच्छ ठेवणे हे ध्येय नाही. ध्येय हे आहे की जीवन बदलावे. जर आपण मुलांना फक्त संदेश दिला तर ते धडा लक्षात ठेवू शकणार नाही किंवा घरी त्याचे लागूकरण करू शकणार नाही. परंतू पवित्र शास्त्रातील गोष्टीच्या वेळेस खेळण्याच्या मातीने आकार तयार करणे हे त्यांना प्रत्येक दिवसाचा धडा लक्षात ठेवण्यासाठी मदत करेल. तर काही जीवनं बदलण्यासाठी उत्साही व्हा आणि भरपूर खेळण्याची माती तयार करा! तुम्ही पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगत असतांना ते गोष्टीतील विविध भाग दाखविण्यासाठी आकार तयार करतील. गोष्टीच्या शेवटी तुम्ही होईल तितक्या लवकर माती त्याच पिशवीत गोळा कराल. आम्ही शिफारस करतो की तुम्ही खेळण्याच्या पीठाचा भरपूर साठा तयार केला की तुम्ही त्याला प्रत्येक मुलासाठी लहान गोळयात विभागावे. मग तो प्रत्येक गोळा प्लास्टिकच्या पिश्वीत टाकावा. अशा रितीने तुम्ही ते पटकन वाटण्यासाठी आणि पवित्र शास्त्रातील गोष्टी नंतर परत गोळा करण्यासाठी तयार राहाल. काही रूमाल आणि शक्य असल्यास पाण्याच्या काही बदल्या तयार ठेवा जिथे तुमचे विद्यार्थी गरज पडल्यास हात धुवू शकतील. आमच्या आवडत्या खेळण्याच्या पीठाची कृती इथे समाविष्ट करीत आहोत. आम्ही आशा करतो की तुम्ही सार्वकालिकतेसाठी जीवनं बदलत असतांना काही मजा कराल! जागा कागदाने किंवा प्लास्टिकने सुरक्षित करावी जेणे करून मातीने चटई किंवा मुलांचे कपडे मळीन होणार नाही. वेळे आधी काही मदतनीस तयार ठेवा किंवा तुमच्या सर्व पुढाऱ्यांना तुम्हाला सर्व माती गोळा करण्यास मदत करण्यास तयार ठेवा. तुम्ही पवित्र शास्त्राचे पुनरावलोकन करत असतांना काय करावे ह्याचे निर्देश दररोजच्या धड्याच्या निर्देशात दिलेले आहेत. आमच्या आवडत्या खेळण्याच्या पीठाची कृती इथे समाविष्ट करीत आहोत. आम्ही आशा करतो की तुम्ही सार्वकालिकतेसाठी जीवनं बदलत असतांना काही मजा कराल!

**फळांची घरगुती माती :**

2 1/4 कप पीठ
1 कप मीठ
2 चमचे टांग सरबत पावडर
4 चमचे तेल
1 कप पाणी

Uघरगुती माती तयार करण्यासाठी शरबताचे पावडर वापरणे योग्य आहे कारण त्यामूळे पीठाला केवळ रंग येत नाही तर त्याला सुंदर सुवासही येतो! पीठ, मिठ आणि शरबाताचे पावडर स्टो वर एकत्र करा, मग पाणी आणि तेल टाका. त्याचा गोळा तयार होई पर्यंत मंद आचेवर ढवळत राहा. भांडयातून बाहेर काढा आणि काही मिनिटासाठी ते हाताने मळा!





**सोपी घरगुती माती :**

2 कप पीठ
1 1/2 कप मीठ
1 चमचे तेल
250 मिली (1 कप) थंड पाणी
7-10 थेंब खाण्याचा रंग किंवा टांग (सरबत पावडर)

अर्धे पीठ आणि मीठ एकत्र करा. वेगळया भांडयात पाणी, तेल आणि रंग एकत्र करा आणि त्यात पीठाचे मिश्रण टाका. आवश्यकतेनुसार बाकीचे पीठ टाका. पीठ टाकलेल्या जागेवर मऊ होई पर्यंत मळा. आवश्यकतेनुसार बाकीचे पीठ टाका. पीठ टाकलेल्या जागेवर मऊ होई पर्यंत मळा. हा खेळण्याच्या पीठाचा सोपा प्रकार आहे आणि शिजविण्याची गरज नाही!

# स्थानकं

## पाठांतर वचन खेळ (माती खेळ वेळेचा भाग)

पवित्र शास्त्रातील वचन शिकणे आयुष्यभर टिकते. देव अनेकदा मार्गदर्शन आणि शिकवण्यासाठी योग्य वेळी एखाद्या व्यक्तीच्या स्मरणात वचन आणतो. पाठांतराचे कार्य मजेदार क्रियेत बदलणे ते आनंददायक, जलद आणि सोपे बनवते. खेळाची ओळख करून द्या, नियम समजावून सांगा, कसे जिंकायचे आणि विद्यार्थ्यांना आठवण करून द्या की संघाचे गुण मिळवता येतील. आवश्यक पुरवठा आणि सूचना दैनंदिन पाठ योजनेत सूचीबद्ध केल्या आहेत. खेळ पुन्हा पुन्हा खेळा जेणे करून अनेकांना "जिंकण्याची" संधी मिळेल. ध्येय हे आहे की वचन पाठ करत असतांना खूप मजा येईल. ही कृती वर्गाची उरलेली वेळ भरू शकते. मुलांना जागा स्वच्छ करून दुस-या गटाला येण्यासाठी तयार ठेवायला सांगा.

## हस्तकला स्थानक (तुमच्या भ्रमणातील हे पहिले स्तानक नसेल)

हस्तकला व्ही बी एस चा मजेचा भाग असू शकते. आम्ही आमच्या सर्व हस्तकलेसाठी ऑनलाइन नमुने तयार केले आहेत जे तुम्ही उतरवू शकता आणि तुमच्या व्ही बी एस साठी वेळे आधी हस्तकृती तयार करू शकता. खात्री करा की प्रत्येक मुलाला मळीण होता येईल आणि त्यांना खूप प्रीती दाखवा! पालकांना त्यांची कलाकृती आवडेल आणि ते प्रत्येक दिवसाच्या पवित्र शास्त्रातील  धड्याच्या ध्येयाची आठवण करून देणारे असतील, म्हणून परिणाम परिपूर्ण आहे किंवा तुमच्या नमुन्याप्रमाणे हुबेहूब बनवला आहे की नाही हे महत्त्वाचे नाही.

## फराळाची वेळ

प्रत्येक धड्यात सुचविलेल्या फराळाचे चित्र व कृती आहे. तुम्हाला सॅनिटायझर उपलब्ध करून द्यावेसे वाटेल. तुम्ही विद्यार्थ्यांना कसे वाढाल याची योजना करा आणि फराळ तयार करा आणि ते वाढण्यासाठी तयार असा.

## खळाची वेळ

दररोज भरपूर मनोरंजनासाठी प्रदान केलेल्या खेळासोबत हे आवडीचे राहील. प्रत्येक दिवसाच्या समारोप समारंभात कोणत्या रंगाचा बंडाना किंवा रिबन जिंकेल याची नोंद ठेवण्यास विसरू नका. गुण बक्षीस देण्यासाठी संघांना चांगली खिळाडूवृत्ती आणि प्रोत्साहन द्या. मजा करा!

## समाप्ती

चार संघ नेत्यांना व्यासपीठावर आमंत्रित करा. त्यांना त्यांच्या संघाचे प्रोत्साहन सादर करण्याची परवानगी द्या. प्रत्येक संघाने त्या दिवसासाठी जिंकलेले गुण घोषित करा. कोणता संघ पुढे आहे हे जाणण्यासाठी  विद्यार्थी उत्सुक राहतील. प्रत्येकाला आठवण करून द्या की आठवड्याच्या शेवटी सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या संघासाठी एक बक्षीस असेल. त्या दिवसातील पवित्रशास्त्रा मधील वचने उद्धृत करून मुलांच्या संपूर्ण गटाचे नेतृत्व करा. मुलांनी गैरहजर असू नये म्हणून दुसऱ्या दिवसासाठी नियोजित काहीतरी मजेदार गोष्टींबद्दल एक सूचना द्या. त्यांना त्यांच्या मित्रांना सुट्टीतील पवित्र शास्त्रशाळेत जी मजा येत आहे त्याबद्दल सांगण्यास सांगा व उद्या येण्यासाठी त्यांना आमंत्रित करा. गोष्टीचे मुख्य ध्येय आणि लागुकरणाचे थोडक्यात पुनरावलोकन करा. प्रार्थनेने बंद करा. जो पर्यंत पालक येऊन मुलांना नेत नाही तो पर्यंत जे आराधना गीते तुम्ही दिवसाच्या सुरवातीला जायले ते गाऊन अतिरिक्त वेळ भरून का

# अधिक बोनस कल्पना



आपल्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेची मजा आणि थीम लक्षात ठेवण्याचा फोटो शूट हा एक मजेदार मार्ग आहे.

मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी फोटो काढण्याची संधी देऊ या. तुम्ही हे व्ही बी एस विशेष करू शकता जे ते वर्षानुवर्षे आठवतील.




होय, मुली मुच्छीवर सुंदर दिसतात!



तुमच्या फोटो बूथ साठी साहित्य योग्य आहेत.



# सजावट




फुग्यांनी तयार केलेल्या मोठया सजावटीने तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेसाठी उत्साहाचे वातावरण तयार करा.

त्यासाठी खूप गरम हवा लागेल असे दिसते काय? कदाचित जेव्हा तुमच्या शिक्षकांची बैठक होईल तेव्हा प्रत्येक स्वयंसेवकाने मदत करण्यासाठी काही फुगे फुगवावे आणि सजवटीसाठी वातावरण तयार करावे. ते तुमचा उत्साह पकडतील आणि त्याच पध्दतीने त्यांची स्वत:ची जागा सजवतील.














# सजावट



या दिवसाचे ध्येय तुरूंगात टाकले आहे. ह्या कल्पनेसह तयार असा.











# सजावट




तुमचा मंच ह्या मोठया पार्श्वभूमिने सजवा **(5 2.5** मिटर**)**






# 1 पाहिजे

## पवित्र शास्त्रातील गोष्ट: मत्तयाला बोलाविले

## नाटक/ लघुनाटिका

मोटू : ओ... मी उत्साही आहे, खूपच उत्साही! मी फक्त ओरडू शकतो! तो किती दूर आहे, किती दूर?
पतलू: सुमारे दोन किलोमिटर दूर.
मोटू : तो रागावलेला असा दिसतो काय?
पतलू: अजून नाही.
मोटू : मला वाटते जेव्हा आपण बेकरीत काय केले हे त्याने पाहिले तेव्हा मला त्याचा चेहरा पाहता आला असता तर बरे असते.
पतलू: बरं, पुन्हा ओरडू नको. मला वाटते की आपण खोडी करून सुटलो आहे, परंतू आपण पुन्हा ओरडू नये.
मोटू: मी नाही ओरडणार. त्याला काही संशय आला नाही, काहीच नाही.
पतलू: तुला खात्री आहे काय की दारावरील लोणी, आणि बादलीत पाणी आणि पिठी साखरेची एक पिशवी पूरेसी होती?
मोटू : अरे नक्कीच, नक्कीच. ते असे नाही की त्याने पोलिसाला आपण त्याच्या कडून चोरी केली असे सांगितले. त्याने आपल्याला सांगितले की आपण स्वतः शरण जावे. हा! आपण शरण जावे? आपण चोर आहोत!
पतलू: चोरांनी पकडले जाऊ नये.
मोटू : आपण कसे पकडले जाऊ? मी माझ्या बाईक वर जोरात जातो.
पतलू: त्याच्या पूढे धावू शकतो? (मोटूला डोक्यावर मागे मारतो) तू पोलिसाच्या गाडी पेक्षा जोरात जाऊ शकत नाही. आपल्याला फक्त ही खात्री करायची आहे की बेकरीमध्ये कोणी आपल्याला पाहिले नसेल.
मोटू: कदाचित थोडया वेळाने आपण शहरात जाऊन पाहू शकतो की आपण काय केले.
पतलू: एक क्षण थांब. मुख्य इनिस्पेक्टर पाहिजेतचे नविन फलक लावत आहे.
मोटू: त्यावर कोणाचे चित्र आहे? कदाचित आपण त्याला जाऊन पकडू शकतो आणि बक्षीस म्हणून काही पैसे मिळवू शकतो.
पतलू: मी पाहिजेच्या फलकाची खालची बाजू पाहू शकतो; ओह बक्षीस ज्यास्त मोठे नाही. फक्त वीस आहे.
मोटू: वीस? कोणत्या प्रकारचा मूर्ख त्याच्या डोक्यावर वीसचे बक्षीस घेऊन तुरूंगात टाकला जाणार आहे?
पतलू: ते एखाद्या चोरा सारखे दिसते.
मोटू: तो कोण आहे? कोणते मूर्ख आहेत?
पतलू: ते आपण आहोत मोटू!
मोटू: काय? त्याला कसे माहित झाले? मला वाटलं आपण शांत होतो आणि कोणीही आपल्याला पाहत नव्हते. राजा त्याच्या वड्यातून शहरातील सर्व पाहू शकतो का? कदाचित तो आपल्याला पाहत आहे?
पतलू: मला नाही माहित, परंतू त्यांनी पाहिजेचे फलक लावले आहे चित्रासह आणि तो नक्कीच तू आहेस. मला वाटते मी चांगला दिसतो आणि माझ्या चित्रा पेक्षा थोडा मोठा. (केस निट करत आणि उंच उभा राहत)
मोटू: ते खूप निराशा जनक आहे! मी रडू शकतो. मी फक्तओरडू शकतो.
पतलू: नाही आता ओरडू नकोस!
मोटू: (मोठ्याने ओरडण्याचा आवाज करावा. )
पतलू: तू तसे केले नसतेस तर बरे होते.
मोटू: का?
पतलू: (मोटूला डोक्यावर मागे मारतो) त्यांनी तुझा आवाज ऐकला आणि ते आपल्याकडे येत आहेत. चल इथून निघू या!

# मुख्य धडा

मत्तय **9:9-13**

तुम्ही पाहिजे आहात.
तुमचे नाव फलकावर आहे, आणि लोक तुम्हाला शोधत आहेत.
परंतू कशाला? कारण तुम्हाला रंगे हात पकडले आहे.
तुम्ही पापात पकडले गेले आहात. “काय?” तुम्ही विचाराल.
होय. देव सर्व काही पाहू शकतो. जेव्हा तुम्ही तुमच्या आईवडीलां बरोबर खोटे बोलता किंवा चॉकलेट चोरता किंवा शाळेत तुमच्या शिक्षकापासून लपता. देव सर्व काही पाहू शकतो. जर तुम्ही पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवता तर तुमचा हात वर करा. वाह, ते चांगले आहे! आता जर तुम्ही येशूवर विश्वास ठेवता तर हात वर करा. वाह, उत्तम! तुम्हाला माहित आहे काय की पवित्र शास्त्र सांगते की सर्वांनी पाप केले आहे? बरोबर. तुम्ही आणि मी दोघांनीही पाप केले आहे. आणि येशूने म्हटले की आपण सर्वांनी पाप केले आहे! म्हणून जर तुम्ही पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणार असाल तर, तुम्ही आजच्या किल्ली वचनावरही विश्वास ठेवावा:“कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला अंतरले आहेत.” रोम 3:23 देव परिपूर्ण आहे. तो कधीही काही चूक करत नाही. परंतू पवित्र शास्त्र सांगते की आपण नेहमी कमी पडतो. आपण सर्वांनी देवाचा इच्छे विरुद्ध खूप गोष्टी केल्या आहेत. परंतू तो गोष्टीचा शेवट नाही. देवाला माहित आहे की आपण सर्व पापी आहोत, परंतू तरीही तो आपल्या बरोबर बोलू इच्छितो, त्याच्या गौरवासाठी आपला उपयोग करू इच्छितो आणि आपल्या बरोबर मैत्री करू इच्छितो. आजची पवित्र शास्त्रातील गोष्ट एका पापी व्यक्तिची आहे ज्याबद्दल येशूला माहित होते की त्याने चूक केली आहे. परंतू येशू थांबला आणि तरीही त्याच्या बरोबर बोलला. येशूने तरीही त्याला बोलाविले. तुमच्या पैकी किती जणांची इच्छा आहे की जरी तुम्ही चुकले असले तरी देवाने थांबून तुमच्या बरोबर बोलावे? छान! मलाही वाटते! पवित्र शास्त्र सांगते की येशू वाटेने जात होता आणि त्याला मत्तय नावाचा एक जकातदार दिसला. त्या दिवसात जक्कातदार लोकांचे पैसे घेणारे म्हणून ओळखल्या जात असत. मुळात ते नेहमी लोकांकडून चोरत असत. ते इतके वाईट होते की “जकातदार” हा शब्द म्हणजे “पापी” असे लोक समजत असत! तुमचा व्यवसाय “पापी” आहे ह्याची तुम्ही कल्पना करू शकता काय कारण तुमच्या कामातील कितीतरी जण खोटे बोलले किंवा त्यांनी फसविले किंवा चोरी केली? मी खात्री पूर्वक म्हणू शकतो की तुम्ही अशा कामाची कल्पना करू शकता जिथं लोक सहस मानतात की तुम्ही खोटे बोलता किंवा चोरी करता कारण तुमच्या देशात तशा प्रकारचा व्यवसाय आहे. तुमच्या देशात लाच घेणारे लोक आहेत काय? तो बाजूने जात होता आणि त्याने मत्तयाला जक्कातदाराच्या नाक्यावर बसलेले पाहिले. येशूने मत्तयाला म्हटले,“माझ्या मागे ये.” मत्तय लगेच उठला, आणि त्याचा नाका सोडला आणि येशूच्या मागे गेला! मत्तय आता त्यांच्या नाक्यावर नव्हता परंतू त्याने येशूच्या मागे जाण्यासाठी सर्व काही सोडले होते! नंतर येशू मत्तयाच्या घरी जेवण करत होता, आणि पवित्र शास्त्र सांगते की तिथे बरेच जकातदार आणि पापीजण त्यांच्या बरोबर भोजन करण्यासाठी होते. धार्मीक पुढा-यांनी शिष्यांना विचारले, “तुमचा गुरूजी जकातदार आणि पापीजणां बरोबर भोजन का करतो?” येशूने उत्तर दिले, “निरोग्यास वैद्याची गरज नाही तर रोग्यास आहे.” तुम्हाला माहित आहे काय की तुम्ही रोगी आहात? मी खात्रीने सांगू शकतो तुम्हाला ठिकच वाटत असेल! जेव्हा येशू म्हणाला,“रोग्यांना वैद्याची गरज असते,” तेव्हा तो म्हणत होता की जे पापी आहेत त्यांना तारणा-याची गरज असते. जर तुम्ही विचार करता की तुम्ही परिपूर्ण आहात आणि तुम्हाला मदतीची गरज नाही, तर तुम्ही स्वत:वर अवलंबून आहात. येशू अशा लोकांना मदत करण्यासाठी आला ज्यांना माहित आहे की ते परिपूर्ण नाहीत आणि त्यांना मदतीची गरज आहे. तुम्ही आणि मी पाहिजेच्या फलकावर आहोत. आपण पापात सापडलेले आहोत. पवित्र शास्त्र सांगते की सर्वांनी पाप केले आहे. परंतू तो गोष्टीचा शेवट नाही! येशू अजूनही तुम्हाला शोधत आहे! त्याला माहित आहे की तुम्ही पापी आहात, परंतू त्याला तरीही तुमच्या बरोबर संबंध हवे आहेत. खरंतर, तो पापी लोकांसाठी पृथ्वीवर आला. तुमच्या पैकी किती जणांची इच्छा आहे की येशूने तुमचा मित्र व्हावे? खूप छान! चला एकत्र प्रार्थना करूया.
“येशू, पापी लोकांसाठी ह्या जगात आल्या बद्दल आभारी आहे. मी तुझ्या जवळ आता कबूल करतो की मी पापी आहे. मी चूका केल्या आहेत. माझ्या बरोबर बोलण्यासाठी आणि माझा मित्र होण्यासाठी तयार राहण्यास तुझा आभारी आहे. मी तुझ्या वर विश्वास ठेवतो. आमेन.” आजच्या नाटका/लघुनाटका प्रमाणे तुम्ही आणि मी सुध्दा पहिजेतच्या फलका वर आहोत. परंतू तो गोष्टीचा शेवट नाही. उद्या आपण अधिक नाटक पाहू या आणि देवाबद्दल अधिक शिकू या.

# वचन


" कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत."
रोमकरांस पत्र 3:23


# मतदान

विद्यार्थ्यांना पवित्र शास्त्र वयक्तिक करण्यास प्रोत्साहन द्या. जर ते मत्तय असते  तर त्यांनी त्याने जे केले तेच केले असते काय? तसे करणे त्या देशात योग्य होते काय, परंतु आज माझ्या देशात ते चूक असेल? ते त्याच्यासाठी रास्त होते काय? ते तुमच्या साठी रास्त राहील काय? जर तुम्ही मत्तयासारखे केले तर तुम्हाला किती त्रास होईल?
तुम्हाला काय वाटते?

* मत्तयाने त्याचे काम करत त्याच्या टेबलाजवळ थांबायला हवे होते काय. त्याच्या कामाच्या वेळेच्या मध्येच जाणे चूकीचे होते.

* मत्तयाने त्याचे काम सोडून योग्य ते केले. त्याने अधिक चांगली संधी पाहिली आणि त्याच्या बद्दल त्याला विचार करायचा नव्हता.




# दिवस 1 विध्यार्थी पुस्तके

## मोठ्या मुलांसाठी प्रश्न व उत्तरे

**1. तुम्ही ओळखत असलेले सर्वात चांगले व वाईट लोकांचा विचार करा. जर दोघेही रहदारीच्या टक्करीत मरण पावले तर स्वर्गात येशू बरोबर वेळ घालविण्यासाठी कोण उठेल? तुम्हाला असे का वाटते?**
उत्तरः कोणीही कितीही चांगले असले तरी ते चांगले आहेत म्हणून स्वर्गात जाउ शकत नाही... रोम 3 :23 जो कोणी येशूवर विश्वास ठेवतो व क्षमा मागतो त्याला देव क्षमा करील.. योहान 1: 12 प्रसिध्द लोक व माफिया यांची चर्चा करा. जर तुमच्याकडे वेळ असेल तर ख्रिस्ती नाहीत परंतू त्यांनी खूप चांगले कामे केलीत अशा काही लोकांना ऑनलाइन शोधा, आणि काही असे जे जेल मध्ये शिक्षा भोगत असतांना ख्रिस्ती झाले. ह्यांच्या पैकी कोण स्वर्गात जाईल?

**2. आजच्या पवित्र शास्त्राच्या गोष्टीत कोणी लाच घेतली ते बेकायदेशीर होते का?**
उत्तरः मत्तय हा कर वसूल करणारा होता. त्याने लाच घेली किंवा आवश्यकतेपेक्षा ज्यास्त गोळा केले जेणेकरून त्याला स्वतः ज्यास्त पैसे मिळतील. होय ते बेकायदेशीर होते आणि रोम त्याला कर गोळा करण्यासाठी घेतलेले देय मानत असे. घोटाळे, चोरी, आणि वस्तू कमिशवर उच्च दरात विकणे यातील समानतेची चर्चा करा.

**3. मत्तयासारखे, तुमच्या समाजात तुच्छतेची नोकरी कोणती आहे? जर आज येशू इथे असता तर ते काम करणारा व्यक्ति त्याचा शिष्य व प्रतिनिधी व्हावा असे येशूला वाटले असते काय?**
उत्तरः प्रत्येक देशात वेगळे उत्तर राहिल, परंतू उत्तरात गुलामगिरी, वेश्याव्यवसाय, स्वच्छतागृहे किंवा गटारे साफ करणे, कारखान्यातील धोकादायक काम इ. यांचा समावेश असू शकतो. आज येशूला ते हवे असतील काय? "होय!" त्याने मत्तयाला मुद्दाम निवडिले. तो आजही लोकांना बोलावितो त्यांचे काम कोणतेही असले तरी.




सारखे शब्द योग्य रित्या जोडा, रेषा ओलांडल्या शिवाय. खोडण्यासाठी पेन्सिलचा उपयोग करा.

# विद्यार्थी पुस्तके

## चक्रव्यूह

चित्रात निर्देश करणा-या बाणापासून सुरवात करा आणि एक खुला मार्ग शोधा जो बाहेर जाणा-या बाणाला ओलांडत नाही.

### प्रगत - कठिण



### मध्यम



### सोपे




### शब्दशोध

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गौ | णा | नि | रा | बो | ल | ल | बा | डी | ले | म | रा | वि | प |
| गो | चो | र | गो | णा | म | गौ | ह | ल | फ | दे | णा | गो | गौ |
| पो | ल | वि | रा | ले | पा | ड | नि | गो | व | ड | बो | नि | ले |
| रा | नि | णा | क | बो | ह | प | रि | गौ | रि | व | ड | प | पो |
| णा | गो | र | ड | फ | ले | वि | रा | गो | ल | ह | र | ड | गो |
| वि | बो | प | म | पो | रा | णा | नि | बो | प | नि | गो | गौ | ळा |
| स | ला | बो | णा | फ | वि | जा | रा | वि | ले | म | ल | गौ | क |
| फ | वि | व | ड | नि | ल | म | त्र | प | रि | बो | ड | णा | र |
| गौ | ले | ल | प | गो | रा | शा | णा | ल | ह | म | गो | ल | णे |
| नि | ले | फ | पे | बो | स्त्र | ले | नि | गौ | ले | ह | प | वि | नि |
| बो | म | णा | शा | रा | पो | लि | स | णा | म | ड | म | ले | बो |
| प | वि | गो | ले | ौग | फ | ल | रा | बो | त्त | बो | नि | चो | फ |
| गौ | रा | ये | शू | णा | प | वि | म | ले | य | रा | गो | णा | री |

पाप
गौरव
बोलाविलेले
पोलिस
महल
राजा
निवड
लबाडी
चोरी
येशू
पवित्रशास्त्र
कर
गोळाकरणे
फसविणारा
पेशा
देव
मत्तय
चोर

राणीचे चित्र पूर्ण करा



खालील ज्या लोकांनी पाप केले आहे त्याला गोल करा.



उत्तरेः येशू सोडून सर्वांना गोल करा. सुपर हिरो जो पाप विरहित आहे त्याच्या बद्दल चर्चेला प्रोत्साहन द्या कारण तो खरा व्यक्ति नाही तर तो काल्पनीक आहे. चर्चा करा की ही वास्तविकता आहे की येशू हा काल्पनिक नसून वास्तविक आहे, आणि त्याचा पापविरहितपणा देखील वास्तविक आहे. जर सुपरहिरो खरे असते तर, त्यांनी आपल्या सारखे पाप केले असते जरी आपण नेहमी चांगले राहण्याचा प्रयत्न केला तरी.

डवीकडील डब्यात नकारात्मक कृती आहेत. उजवी कडी डब्यात संभाव्य प्रतिसाद आणि परिणाम आहेत. ज्या नकारात्मक कृती त्यात नाहीत त्या लिहा.

| | |
|---|---|
| **1. आईबरोबर आपमानजनक बोललो** | **1. तिला माफी मागा** |
| **2. माझ्या बहिणीच्या खोलीतून काही तरी घेतले** | **2. कबूल करा, ते परत करा, क्षमा मागा** |
| **3. पिझ्झाचा शेवटचा तुकडा खाल्ला** | **3. पुढील वेळेस कोणाला आणखी पिझ्झा पाहिजे काय हे घेण्याआधी विचारा** |
| **4. परीक्षेत दुस-या मुलाकडून उत्तर उतरविले** | **4. देव आणि शिक्षकांकडे कबूल करा आणि पुढील वेळी आधिक जोमाने अभ्यास करा जेणे करून मला मोह होणार नाही.** |
| **5. माझ्या मित्राने चॉकलेट विकत घेतले आणि मी ते घेऊन घेतले** | **5. क्षमा मागा आणि ते परत करा किंवा अधिक विकत घ्या आणि ते माझ्या मित्राला द्या.** |

वेगवेगळया शिक्षांनी चर्चा सुरू करण्याची परवांगी द्या आणि धडा अधिक मनोरंजक आणि विद्यार्थ्यासाठी आजच्या जीवनात लागू होण्यास परवांगी द्या . सर्व उत्तरे स्वीकारा, मुलांना बक्षीस व गुन्हेगारीसह मजा करण्याची परवांगी द्या . काही संभाव्य उत्तरेः कुत्र्याला माझे चिप्स् दिले, मला खूप लवकर उठविले, माझे डोके उडविले,इ. संभाव्य बक्षीसेः 1,000,000 रूपये, चिप्सचे दोन पाकीट, आईला अलिंगन, काम करण्यापासून बाहेर पडण्यासाठी विनामूल्य पास.

# घरगुती मातीसह पवित्र शास्त्र उजळणी

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीसाठी घरगुती माती काढू या!

पवित्र शास्त्र सांगते की येशू वाटेने जात होता आणि त्याला मत्तय नावाचा एक जकातदार दिसला. तुमच्या मातीचे तीन गोळे करा. दोन मातीच्या गोळयांनी मत्तयासाठी काम करायला टेबल व खूर्ची तयार करू या (जकातदारांबद्दल सांगत असतांना मुलांना टेबल व खूर्ची तयार करण्यासाठी वेळ द्या)

त्या दिवसात जक्कातदार लोकांचे पैसे घेणारे म्हणून ओळखल्या जात असत. ते सरकारसाठी लोकांचा पैसा घेत होते म्हणून, पुष्कळ जण ज्यास्त पैसे घेत होते. मुळात ते नेहमी लोकांकडून चोरत असत. ते इतके वाईट होते की "जकातदार" हा शब्द म्हणजे "पापी" असे लोक समजत असत! तुमचा व्यवसाय "पापी" आहे ह्याची तुम्ही कल्पना करू शकता काय कारण तुमच्या कामातील कितीतरी जण खोटे बोलले किंवा त्यांनी फसविले किंवा चोरी केली? ठिक आहे, आता मातीने मत्तय तयार करा आणि त्याला खूर्ची वर बसवा. (त्यांना मत्तयाला पूर्ण करण्यासाठी थोडा वेळ द्या)

ठिक आहे. तुम्ही ते सर्व तोडा, आणि आता एक पैश्याचा डबा आणि काही नाणे तयार करू या. मी खात्री पूर्वक म्हणू शकतो की तुम्ही अशा कामाची कल्पना करू शकता जिथं लोक सहस मानतात की तुम्ही खोटे बोलता किंवा चोरी करता कारण तुमच्या देशात तशा प्रकारचा व्यवसाय आहे. तुमच्या देशात लाच घेणारे लोक आहेत काय? असे लोक आहेत काय जे त्यांच्यासाठी खोटे बोलता? मत्तयाचे जीवन असे होते. तो माहित असलेला पापी होता. जकातदार लोकांचे पैसे घेत असत आणि सरकारला देण्यासाठी ते डब्यात टाकत असत. फक्त ते सहसा पूर्ण पैसे देत नसत. तुम्ही पैसे मोडू शकता, आणि आता तुमच्या पूर्ण खेळण्याच्या मातीने येशू तयार करू या. तो बाजूने जात होता आणि त्याने मत्तयाला जक्कातदाराच्या नाक्यावर बसलेले पाहिले.


येशूने मत्तयाला म्हटले,"माझ्या मागे ये."मत्तय लगेच उठला, आणि त्याचा नाका सोडला आणि येशूच्या मागे गेला! आता पुन्हा खेळण्याच्या पीठाने टेबल आणि खूर्ची तयार करू या, फक्त ह्या वेळेस ते रिकामे सोडू! मत्तय त्यांच्या नाक्यावर नव्हता परंतू त्याने येशूच्या मागे जाण्यासाठी सर्व काही सोडले होते! आता ताट, जेवण करण्याचा काटा आणि चमचा तयार करू या. नंतर येशू मत्तयाच्या घरी जेवण करत होता, आणि पवित्र शास्त्र सांगते की तिथे बरेच जकातदार आणि पापीजण त्यांच्या बरोबर भोजन करण्यासाठी होते. धार्मीक पुढा-यांनी शिष्यांना विचारले, "तुमचा गुरूजी जकातदार आणि पापीजणां बरोबर भोजन का करतो?"

येशूने उत्तर दिले, "निरोग्यास वैद्याची गरज नाही तर रोग्यास आहे."तुम्हाला माहित आहे काय की तुम्ही रोगी आहात? मी खात्रीने सांगू शकतो तुम्हाला ठिकच वाटत असेल! जेव्हा येशू म्हणाला,"रोग्यांना वैद्याची गरज असते," तेव्हा तो म्हणत होता की जे पापी आहेत त्यांना तारणा-याची गरज असते. जर तुम्ही विचार करता की तुम्ही परिपूर्ण आहात आणि तुम्हाला मदतीची गरज नाही, तर तुम्ही स्वतःवर अवलंबून आहात. येशू अशा लोकांना मदत करण्यासाठी आला ज्यांना माहित आहे की ते परिपूर्ण नाहीत आणि त्यांना मदतीची गरज आहे. (मुलांकडून घरगुती माती परत घ्या)



# खेळ टिक टॅक टो

संघाच्या प्रत्येक सदस्याने पाठांतर वचनाचा अचूक सराव केला तर, त्यांना टिक टॅक  टो वर जागा शोधू द्या आणि त्यांच्या संघाच्या चिन्हाने ते चिन्हांकित करावे किंवा तिथे बसावे अथवा उभे राहावे. ज्या संघाला प्रथम टिक टॅक  टो पूर्ण मिळेल तो विजयी होईल. बोर्डा शिवाय खेळ खेळण्यासाठी तुमच्या वर्गाच्या मध्यभागी खुर्चीच्या तीन ओळी लावा आणि त्यांचा उपयोग टिक टॅक टो सारखे करा. जर तुम्ही तुमच्या वर्गात खुर्चीचा उपयोग करत नसाल तर तुम्ही जमीनीवर कागदी ताटं किंवा कागद टिक टॅक टो म्हणून ठेवू शकता.



# फराळ विशेष काकडी चाट

**साहित्य:**

१ते 2 मोठ्या काकड्या (तुमच्या कडे किती मुले आहेत त्या अनुसार)
¼ कप किसलेला गाजर
2 मोठे चमचे किसलेले खोबरे
¼ कप भाजलेले शेंगदाणे
¼ कप मुरमुरे
1 लहान चमचा चाट मसाला
¼ कप सेव
2 मोठे चमचे हिरवा सांबार
1 लिंबाचा रस चाट सजवायला व वाढायला तुम्हाला कागदी ताट लागतील.



**कृती:**

1. काकडी छीला व मध्यम तुकडे करा.
2. बोल मध्ये किसलेला गाजर, किसलेले खोबरे, शेंगदाणे, मुरमुरे, चाट मसाला, सेव, आणि लिंबाचा रस टाका आणि चांगले एकत्र करा.
3. कागदी ताटात काकडीचे तुकडे ठेवा
4. प्रत्येक काकडीच्या तुकड्यावर एक चमचा मिक्स टाका आणि वरून सांबाराने सजवा.
5. आणि तुमची विशेष काकडी चाट खाण्या साठी तयार आहे

# हस्तकला पोलिस रेडिओ

**साहित्य:**


- प्रत्येक मुलासाठी कागदावर छापलेल्या रेडिओची प्रत
-कात्री
-डिंक
-रंग




**सूचना:**

पायरी 1. रेडिओला तुमच्या आवडीनुसार रंग द्या आणि/किंवा सजवा.
पायरी 2. बिंदू  असलेल्या रेषांवर ते कापून टाका.
पायरी 3. रेषा आणि टॅबवर दुमडा आणि जागी चिकटवा.
पायरी 4. अँटेना कापून आणि चिकटवून समाप्त करा जेणेकरून तुम्हाला चांगले रिसेप्शन मिळेल. तुम्ही चोर कुठे शोधला आहे आणि तुम्ही पुढे कुठे जाणार आहात हे इतर अधिकाऱ्यांना सांगण्यासाठी तुमचा रेडिओ वापरा.

# हस्तकला 1 - पोलिस रेडिओ



# 2 तुरुंगात टाकले

## पवित्र शास्त्रातील गोष्ट: स्त्रीला व्यभिचार करतांना पकडले

## नाटक/ लघुनाटिका

पतलू: हे बिल, मला वाटते आपण त्यांना हारलो.
मोटू: बापरे पतलू कसं काय, आपण शहर सोडने सोडून सर्व काही केले. आपण (हात पक्ष्यासारखे हालवत) जंगली व मोकळे आहोत.
पतलू: ठिक आहे मोटू , मी ह्या टेकडी वरून नजर टाकणार आहे.
मोटू : तू पाहत आहे तोवर मी इथे थांबतो.
पतलू : (कशा तरीच्या वरून पाहतो आणि पटकन खाली बसतो)
मोटू ! त्यांनी आपल्याला शोधले!
पतलू: ओ ह नाही!
मुख्य इन्स्पेक्टर : (आत्मविश्वासू असा मंचावर चालत येतो.) काय मुलांनो.
पतलू : कसे काय मुख्य इन्स्पेक्टर, ह्या चांगल्या दिवशी तुम्ही कसे आहात?
मोटू : कसे काय, पोलिस (गिळतो.)
मुख्य इन्स्पेक्टर :मला वाटते तुम्ही मुलांनी आता माझ्या बरोबर आले पाहिजे.
पतलू : पोलिस आपण कुठे जात आहोत?
मुख्य इन्स्पेक्टर : तुरूंगात. तुम्ही केलेल्या काही गोष्टींसाठी तुम्हा मुलांना उत्तर द्यायचे आहे.
मोटू : तुरूंगात? आम्ही तर फक्त एक छोटीशी खोडी काढली...
पतलू : (मोटूचे नाक मुरडते त्याला बोलणे थांबविण्यासाठी.) होय, फक्त एक निरागस लहान खोडी.
मुख्य इन्स्पेक्टर : मी जे ऐकले ते हे नाही. मला चांगले ऐकू येते. (त्याच्या मोठया कानाकडे हात दाखवित.)
मोटू: बरं, आम्ही किती काळासाठी तुरूंगात जाणार आहोत?
मुख्य इन्स्पेक्टर;जो पर्यंत तुम्ही जे केले त्याची तुम्ही नुकसान भरपाई करत नाही तो पर्यंत. तुम्ही दोघांनी बरंच काही केले आहे.
पतलू : अरे मुख्य इन्स्पेक्टर सर ?
मुख्य इन्स्पेक्टर : होय?
मोटू : काही मार्ग आहे काय की आम्हाला कळू शकेल की आम्ही जे सर्व काही केले त्यासाठी तरूंगातून वाचण्यासाठी किती पैसे देऊ शकतो?
मुख्य इन्स्पेक्टर : काही नाही मी विचार करू शकत नाही.
मोटू : आह, चला! हे बरोबर नाही! (हात वर करत आणि चुकून पतलूला मारतो.)
पतलू : उफ, तुझे हात मारणं बंद कर मोटू . होय मुख्य इन्स्पेक्टर, न्यायाचे काय?
मुख्य इन्स्पेक्टर: बरं मला वाटते की आपण राजा समोर जाऊ तेव्हा आपल्याला बोलण्यासाठी भरपूर वेळ मिळेल.
मोटू : अरे नाही, राजा न्यायी आहेत. पतलू आपण जे केले त्यातून आपण कधीच सुटू शकणार नाही.
पतलू: (त्याचा हात मोटूच्या तोडांवर ठेवत) मोटू शांत रहा.
मोटू : (गोंधळलेल्या आवाजात) चोरी करणे, खोड्या, माझ्या लहान बहिणीला मारणे आणि माझ्या आईची आज्ञा न पाळणे ह्याबद्दल त्याला आधिच माहित आहे. मी माझ्या भावाची पतंग कशी तोडली आणि माझ्या दुस-या भावावर कसे नाव टाकले तेही.
पतलू : शांत रहा मोटू !
मोटू ; जसे काही त्यांना आधिच माहित नाही की तू कसा परवांगी शिवाय मासेमारीसाठी गेला आणि परवानगी शिवाय आंबे तोडले ते. आणि तु हॉटेलच्या कचऱ्यात कसा शोधत होता.
मुख्य इन्स्पेक्टर : खिसा कापणे, आणि साधने उसणे घेणे आणि ते परत न करणे "विसरणे" आणि त्या सर्व खोटया गोष्टी विसरू नका.
पतलू: ओह, मला वाटते ते काही विशेष नाही मोटू. जरी तू तुझे मोठे तोंड उघडले आणि आपण जे काही केले ते सर्व सांगितले तरी राजाला ते आधिच माहित आहे.
मुख्य इन्स्पेक्टर : चला मुलांनो जाऊ या.
मुख्य इन्स्पेक्टर : (स्वतःच्याच पायाला उडखळतो आणि पडतो. उठतो आणि पाहतो की कोणी पाहिले तर नाही ना.)

# मुख्य धडा

## योहान 8: 1-11

तुमचे नाव फलकावर आहे आणि लोक तुम्हाला शोधत आहेत. परंतू आता तुम्ही तुरूंगात आहात! बरोबर, तुम्ही प्रत्यक्षात तुरूंगात आहात! परंतू तुम्हाला वाटत नाही की तुम्ही तुरूंगात आहात, तुम्हाला वाटते काय? तुम्ही आजूबाजूला ताणू शकता आणि असे वाटते की तुम्ही अजूनही स्वतंत्र आहात.

तुम्ही किंवा तुमचे मित्र तुरूंगातील तुमची कोठडी पाहू शकत नाही, परंतू देव पाहू शकतो. खरं तर, तुमचे मित्र त्यांच्या स्वतःच्या तुरूंगात असू शकतात! आपले पवित्र शास्त्रातील आजचे मुख्य वचन आहे, " कारण पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे." रोम 6:23 तुम्हाला कालचा धडा आठवतो काय? आपण सर्वांनी पाप केले आहे, आपल्यातील प्रत्येकाने! बरं, पापाची वास्तविक शिक्षा आहे, आजचे नाटक/लघूनाटका प्रमाणेच, जिथं मोटू आणि पतलू ह्यांची खोडी पकडली गेली आणि त्यांना तुरूंगात टाकण्यात आले. तुमचे आईवडील घरी तुम्हाला शिक्षा करतात काय? उदा. जर तुम्ही घरी तुमचे गृहपाठ पूर्ण करत नाही, तर तुम्हाला तुमच्या मित्रांबरोबर खेळता येत नाही. ही सामान्य शिक्षा असेल. बरं, देवाकडे सुध्दा शिक्षा आहे. ती शिक्षा ज्यांनी पाप केले त्या सर्वांसाठी आहे.

परंतू देव कृपाळू आहे आणि आपण ज्यासाठी पात्र आहोत ते तो नेहमी आपल्याला देत नाही येशू मंदीराच्या आंगणात शिकवित होता त्याच्या आजू बाजूला पुष्कळ लोक होते. त्याच्या आजूबाजूला सर्व लोक असतांना काही धार्मिक पुढा-यांनी व्यभिचारात, एक वाईट पापात सापडलेल्या एका स्त्रीला आणले. त्यांनी तिला पूर्ण जमावासमोर उभे केले.

मोठया जमावा समोर तिचे पाप असे प्रसारित केल्यामूळे तिला कसे वाटले असे तुम्हाला वाटते? ते खूपच संकोचीत करणारे झाले असेल नाही काय? आता तुमच्या स्त्रीला थोडे खाली वाकवा, जणू तिला खूप लाज वाटत आहे. आता तिला दुःखी चेहरा बनवा.

त्यांनी येशूला विचारले काय करावे. त्यांनी सर्वांना तिच्या पापाबद्दल सांगितले आणि म्हटले की नियमशास्त्र सांगते की त्यांनी तिला जीवे मारावे. ते बरोबर आहे; तिच्या पापासाठी सामान्य शिक्षा मरण होते! त्यांनी सर्वांनी दगडं उचलले आणि ते तिला मरे पर्यंत दगड मारणार होते! पवित्र शास्त्र सांगतेः "येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला. आणि ते त्याला एक सारखे विचरीत असतां तो उठून त्यांना म्हणाला.

तुम्हामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा. मग तो पुन्हा खाली ओणवून जमिनीवर लिहूं लागला." "हे शब्द ऐकून वृध्दांतल्या वृध्दापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले; येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती. नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरविला नाही काय? ती म्हणाली, प्रभुजी, कोणी नाही, तेव्हा येशू तिला म्हणाला, मीहि तुला दंड ठरवीत नाही; जा ह्या पुढे पाप करू नको."

येशूने ह्या स्त्रीवर दया केली आणि तिला तिच्या पापाची योग्य शिक्षा दिली नाही. आपणही येशू कडून दया प्राप्त करू शकतो, आणि आपल्या पापासाठी शिक्षा प्राप्त करणार नाही, जरी त्या शिक्षेसाठी आपण पात्र असलो तरी. तुम्हाला ते आवडेल काय? "येशू मी कबूल करतो की मी पापी आहे आणि मी तुझ्या शिक्षेसाठी पात्र आहे. परंतू मी तू त्या स्त्रीला दया दाखविली तिच्या प्रमाणे तुझी दया मागतो.

कृपाकरून माझ्या चूकांची क्षमा करा आणि माझ्यावर दया कर. तुझे आभार मानतो. आजचे नाटक/लघू नाटिके प्रमाणे, तुम्ही आणि मी देखील पकडले गेलो आहे व तुरूंगात टाकले आहोत. परंतू तो गोष्टीचा शेवट नाही. उदा आपण अधिक नाटक पाहू आणि देवा बद्दल अधिक शिकू.

# वचन


" कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे."
रोमकरांस पत्र 6:23

# मतदान

मुलांना हा विचार करण्यासाठी प्रोत्साहित करा की ते जेव्हा पवित्र शास्त्रातील गोष्ट घडत होती तेव्हा जिवंत होते आणि जमावासोबत उभे होते. जर त्यांनी त्यांच्या आजू बाजूच्या लोकांच्या चेहऱ्याकडे पहिले तर ते लोक काय विचार करत होते किंवा त्याच्या भावना काय होत्या हे ते ओळखू शकत होते काय? जेव्हा येशूने वाईट वागणा-या स्त्रीला शिक्षा केली नाही तेव्हा धार्मिक पुढा-यांना काय वाटले?


* त्यांना तिचा राग आला होता! त्यांना तिला खरंच इच्छा होती की तिला दगडमार करून जिवे मारावे.

* त्यांना तिच्यासाठी आनंद झाला! त्यांना वाईट वाटले की तिने पाप केले आणि ती मुक्त झाली म्हणून आणि तिला अधिक चांगल्या निवडी करण्याची संधी मिळाली म्हणून ते आनंदी होते.


2 वेळ मतदान
स्त्रीला व्यभिचार करताना पकडले
जेव्हा येशूने वाईट वागणा-या स्त्रीला शिक्षा केली नाही तेव्हा धार्मिक पुढा-यांना काय वाटले?

| त्यांना तिचा राग आला होता! त्यांना तिला खरंच इच्छा होती की तिला दगडमार करून जिवे मारावे. | त्यांना तिच्यासाठी आनंद झाला! त्यांना वाईट वाटले की तिने पाप केले आणि ती मुक्त झाली म्हणून आणि तिला अधिक चांगल्या निवडी करण्याची संधी मिळाली म्हणून ते आनंदी होते. |
|---|---|
| सोपे | |
| मध्यम | |
| कठिण | |
| प्रगत | |

Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत



# दिवस 2 विद्यार्थी पुस्तके

## मोठ्या मुलांसाठी प्रश्न व उत्तरे

**1. वर्ग ह्या नात्याने तुम्ही  किंवा इतरांनी काही चूक केल्याबद्दल दोषी आढळल्यावर दिलेल्या शिक्षेची यादी तयार करा. यादी तीव्रतेच्या क्रमाने ठेवा.**

आईची पाहणे, थोडा स्क्रीन वेळ गमावणे, हातावर एक हलकी थापड, ओरडणे, वेळ काढण्यासाठी तुमच्या खोलीत पाठवलेले, आठवडाभरासाठी ग्राउंड केलेले, रात्रीचे जेवण किंवा मिष्टान्न यांसारख्या गोष्टींपासून प्रतिबंधित, चटके, ..... आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीच्या  कायद्याने म्हटल्याप्रमाणे दगडमार करून ठार मारले.

**2. एखादा कायदा किंवा शाळेच्या नियमाचे  सर्वात वाईट उल्लंघन कोणते  आहे ज्याला तुम्ही कोणीतरी मोडतांना आणि पकडले गेले नाही किंवा शिक्षा झाली नाही असे पाहिले आहे?**

मुलांना उदाहरणे देण्यास मदत करण्यासाठी स्थानिक बातम्यांमधून उदाहरण तयार करा. तुम्ही केलेल्या एखाद्या गोष्टीचे तुमच्या स्वतःच्या आयुष्यातील उदाहरण द्यायला तयार राहा पण ते पकडले नाही आणि तुम्हाला ते कसे वाटले ते सांगा. आपण शेवटी कबूल केले का?

**3. तुमच्या सर्व वाईट कृती किंवा शब्द तुमच्या पालकांपासून लपवणे शक्य आहे का? देवाकडून?**

उत्पत्ति 3:8 यिर्मया 23:24 यहोशवा 7:19

**4. तुमच्या शिक्षक, आई, बाबा, पोलिस इ. पासून काहीतरी लपवण्यासाठी तुम्हाला काय करावे लागेल?**

उत्तरे वेगवेगळी असतील परंतु विद्यार्थ्यांना हे कबूल करण्यास प्रोत्साहित करा की एक पाप अनेकदा दुसरे पाप झाकण्यासाठी खोटे बोलण्यास प्रवृत्त करते.

## प्रगत- कठिण

उत्तरे: विविध शिक्षांनी चर्चा सुरू करण्यास आणि धडा अधिक मनोरंजक आणि विद्यार्थ्यांसाठी सध्याच्या जीवनात लागू होण्यास अनुमती द्या. आम्ही ज्या गोष्टींपासून दूर जाऊ शकतो त्याबद्दल बोला कारण, "प्रत्येकजण ते करतो," परंतु तरीही ते चुकीचे असू शकते. मुलांनी लहान असतांना योग्य गोष्टी करायला शिकावे अशी पालकांची इच्छा आहे त्या कारणांबद्दल बोला. जर मुल आयुष्यातील महत्वाच्या गोष्टी शिकत नसेल तर त्यांचे प्रेमच त्यांना त्यांच्या शिकवणीला शिक्षेसह बळकट करण्यास प्रवृत्त करते.

### प्रत्येक गोष्टीसाठी योग्य शिक्षा जुळवा

**चॉकलेट**
**चोरणे एखाद्याला मारणे**
**परीक्षेत फसवणे**
**ख्रिस्ती नाही असे सांगणे**
**एक गोड मिठाई चोरणे**
**आपण हे केले  ते नाकारणे**
**आपल्या बहिणीच्या वस्तूला**
**स्पर्श करणे किंवा कुत्र्याला लाथ**
**मारणे चांगले अन्न फेकणे**
**एखाद्याबद्दल चुगली करणे**
**फर्निचरला डिंक चिकटवणे**
**जेवणाच्या**
**वेळी प्रार्थना करणे विसरणे**
**येशूकडे दुर्लक्ष**
**करणे आजारी असल्याचे**
**भासवून**
**पाप करणे**

**टाइम-आऊट**
**मरण**
**जेल मार**
**हे विसरून जा**
**प्रत्येकजण ते करतो तुम्हाला**
**माफ करा म्हणत माफी मागणं**
**पुन्हा कधीही न करण्याचे वचन**
**देणे पैसे देऊन**
**पैसे देणे**
**तुमच्या खोलीत जाणे**
**जेवण न करणे**
**शिव्या देणे (काहीतरी रोखणे)**

### लपलेले 8 वधस्तंभ  शोधा आणि रेखाचित्र रंगवा.



# विद्यार्थी पुस्तके


## चक्रव्यूह

चित्रात निर्देश करणा-या बाणापासून सुरवात करा आणि एक खुला मार्ग शोधा जो बाहेर जाणा-या बाणाला ओलांडत नाही.




चित्रात जे नाही ते काढा


### प्रगत- कठिण



### मध्यम



### सोपे



## शब्दशोध

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्ञा | प | पा | खि | हा | प्र | वे | प | पा | द | हा | सा |
| हा | खो | द | ज्ञा | पा | त | सा | हा | म | णा | रि | प |
| पा | सा | डी | पो | न | पो | खि | क्त | मु | प्र | खि | प्र |
| प्र | द | ग | ड | वे | पा | प | जे | पा | हा | वे | आ |
| पा | खि | हा | शि | द | ज्ञा | खि | क | ल | पो | पा | ज्ञा |
| हि | स | प | पो | क्षा | पा | प्र | द | ज्ञा | र | प | मो |
| जे | क्षी | वे | ज्ञा | सा | प्र | खि | वे | चो | ।प | ।ह | ड |
| त | ब | पा | हा | पो | सा | ज्ञा | हा | द | प्र | वे | णे |
| खि | क | वे | द | चो | क | प | पा | सा | त्ये | क | खि |
| प्र | लि | खि | र | प | पो | रा | जा | क | क | द | पो |
| पा | का | हा | ज्ञा | सा | खि | पो | वे | खि | ज | ज्ञा | लि |
| सा | र्व | प्र | हा | त | क | डी | ज | पो | ण | प | स |
| ज्ञा | सा | वे | पा | प | हा | पो | ला | सा | प्र | पा | हा |

जेल
पाहिजेत
खिसाचोर
ज्ञामोडणे
हातकडी
वेतन
प्रत्येकजण
शिक्षा
सार्वकालिकब
क्षीस
खोडी
राजा
परिणाम
लाज
चोर
दगड
मुक्त
पोलिस

# घरगुती मातीसह पवित्र शास्त्र उजळणी

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीसाठी माती  काढू या!

येशू मंदीराच्या आंगणात शिकवित होता त्याच्या आजू बाजूला पुष्कळ लोक होते. आपल्या खेळण्याच्या माती ने पूर्ण गर्दी तयार करू या. त्याच्या आजूबाजूला सर्व लोक असतांना काही धार्मिक पुढा-यांनी व्यभिचारात, एक वाईट पापात सापडलेल्या एका स्त्रीला आणले.

त्यांनी तिला पूर्ण जमावासमोर उभे केले. आता स्त्री बनवू या. मोठया जमावा समोर तिचे पाप असे प्रसारित केल्यामूळे तिला कसे वाटले असे तुम्हाला वाटते? ते खूपच संकोचीत करणारे झाले असेल नाही काय? आता तुमच्या स्त्रीला थोडे खाली वाकवा, जणू तिला खूप लाज वाटत आहे. आता तिला दु:खी चेहरा बनवा. त्यांनी येशूला विचारले काय करावे.

त्यांनी सर्वांना तिच्या पापाबद्दल सांगितले आणि म्हटले की नियमशास्त्र सांगते की त्यांनी तिला जीवे मारावे. ते बरोबर आहे; तिच्या पापासाठी सामान्य शिक्षा मरण होते! त्यांनी सर्वांनी दगडं उचलले आणि ते तिला मरे पर्यंत दगड मारणार होते! (आता काही दगडं तयार करू या जसे ते तिच्यावर फेकणार होते.)

पवित्र शास्त्र सांगतेः "येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला. आणि ते त्याला एक सारखे विचरीत असतां तो उठून त्यांना म्हणाला. तुम्हामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा. मग तो पुन्हा खाली ओणवून जमिनीवर लिहूं लागला." आता आपल्या मातीने येशू तयार करू या."हे शब्द ऐकून वृध्दांतल्या वृध्दापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले; येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती.

नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरविला नाही काय?
 ती म्हणाली, प्रभुजी, कोणी नाही, तेव्हा येशू तिला म्हणाला, मीहि तुला दंड ठरवीत नाही; जा ह्या पुढे पाप करू नको."
(मुलांकडून माती परत गोळा करा)



# खेळ पाठांतर वचन वेळ

फळ्यावर पाठांतर वचन  लिहा. प्रत्येक वेळी मुलांना वचनाची पुनरावृत्ती करण्यास सांगून एका वेळी एक शब्द मिटवा. तुमच्याकडे पांढरा  बोर्ड किंवा चॉक बोर्ड नसल्यास, वैयक्तिक नोट कार्ड्स किंवा कागदावर वचन  लिहा. प्रत्येक वेळी एखादा शब्द काढला की तो शब्द वाचता येणार नाही म्हणून फक्त कागद उलटा. संपूर्ण वचन  पुसून, झाकून किंवा उलटे होईपर्यंत सुरू ठेवा आणि मुले ते वाचू शकतात असे भासेल.

# फराळ जेम्स कपकेक

1. केक मिक्स दिशानिर्देशानुसार, तुमच्या मुलांसाठी पुरेसे कपकेक बेक करा किंवा फक्त वरच्या बाजूला आयसिंग असलेले केक  बेकरीमधून ऑर्डर करा.

2. जेम्स विकत घ्या  आज तुमचे विद्यार्थी फ्रॉस्टिंगसह किंवा त्याशिवाय जेम्स स्वादिष्ट कपकेकचा आनंद घेतील. कपकेक हे जेम्सच्या गोळ्यांनी  सजवले जाऊ शकतात जे भारतात सहज उपलब्ध आहेत. मुलांना त्यांच्या आवडीनुसार वेगवेगळ्या आकारात आणि रंगांमध्ये जेम्सच्या गोळ्या  ठेवण्यात मजा येते. चित्रात दाखवल्याप्रमाणे तुम्ही कप केक बेक करू शकता किंवा तुम्ही तुमच्या स्थानिक बेकरीमध्ये जाऊन काही सोपे मफिन घेऊ शकता.



# हस्तकला दार लटकन

**साहित्य:**

- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वाड्याची एक प्रत छापा कात्री डिंक गिफ्ट रिबन किंवा कुरळी
- रिबन
- पेपर
- पंच रंग

**सूचना:**

पायरी 1. वाड्याला रंग द्या आणि/किंवा सजवा.
पायरी 2. बिंदू  रेषांवर  ते कापा
पायरी 3. जिथे हुक अनेक वेगळे छिद्र करत असेल तिथेच पंच करा, हे ऐच्छिक आहे.
पायरी 4. छिद्रांच्या आत रिबन किंवा कर्ली थ्रेड करा. तुमचा अविश्वसनीय दरवाजा लटकन तयार आहे.



# हस्तकला **2** – दार लटकन






# 3 सोडविले

## पवित्र शास्त्रातील गोष्ट:येशू वधस्तंभावर मरण पावला.

## नाटक/ लघुनाटिका

मुख्य इन्स्पेक्टर: हे तुम्ही दोघे उठा!
पतलू: (झोपेत उठत.)
मोटू: ( झोपेतून उडी मारून उठतो) हा, काय आहे? तुम्हाला एकटे वाटले काय आणि आणखी गोष्ट ऐकायची आहे?
मुख्य इन्स्पेक्टर: ओह, नाही, कृपाकरून आणखी एक गोष्ट नाही. मी आलो आहे कारण तुमच्यासाठी एक ऑफर आहे.
पतलू: ऑफर, अहो, तुला भेटायला कोणी मित्र आले आहेत काय?
मोटू: अं, मला विचार करू दे... नाही.
पतलू: मला पण नाही.
मोटू : कोण आहे पोलिस?
मुख्य इन्स्पेक्टर: एक माणूस ऑफर घेऊन.
पतलू: कोणत्या प्रकारची ऑफर? म्हणजे नोकरीची ऑफर?
मुख्य इन्स्पेक्टर: होय, त्यासारखे थोडे.
मोटू: आ, आपल्याला नोकरीची गरज नाही पतलू? आपण जंगली आणि मुक्त आहोत. (पक्ष्यासारखे हात हातवत.)
मुख्य इन्स्पेक्टर: तुम्ही इथे मुक्त असल्यासारखे दिसत नाही तुम्हाला माहित आहे. कदाचित तुम्ही त्याचे ऐकून घेतले पाहिजे.
पतलू: आम्हाला भेटायला कोणी आले नाही; तर आपण ऑफर ऐकली पाहिजे.
मुख्य इन्स्पेक्टर: मी काही वेळा पूर्वी त्याच्या ऑफर वर घेतली. मला आता पर्यंत मिळालेली सर्वात चांगली ऑफर.
पतलू: तू ते ऐकले ? त्याचे ऐकून घेऊ या.
मोटू: बरं, मला माहित नाही.
पतलू: (मोटूच्या डोक्याच्या मागे मारतो)
मोटू: मला वाटते आपण ऐकू शकतो.
पतलू: होय, सांगा, मुख्य इन्स्पेक्टरला इथे आणा.
मुख्य इन्स्पेक्टर: इथे नाही मित्रांनो, तुम्हाला त्याच्या सोबत टेकडी वरील वाड्यात जायचे आहे.
पतलू: तुमचा अर्थ आहे आम्हाला बाहेर जात येईल? जर आम्ही पळून गेलो तर?
मुख्य इन्स्पेक्टर: तुम्हाला समजले नाही, नाही काय? त्याने तुम्हाला इथून सोडविले आहे. तुम्ही जाण्यासाठी स्वतंत्र आहात. त्याने स्वतःला तुमच्यासाठी ओळीत ठेवले.
मोटू: (खूप उत्साहाने बोलतो.) मी विचार करत होतो की पकडले जाणारे मूर्ख आपण आहोत. आता पहा कोण मूर्ख आहे. जर आपण तिथे गेलो नाही आणि त्याची ऑफर ऐकली नाही तर?
पतलू: अरे, इथून बाहेर जाणे खूप छान होईल. मी माझ्या पंखाखाली हवा अनुभवू शकतो. चल जाऊ या.
मोटू: राजवाड्यात? की आपल्या लपण्याच्या जागी परत?
पतलू: बरं, जर आपण राजवाड्यात गेलो नाही तर तो आपल्याला कसा शोधेल? की आपण खटल्यावर जावे? त्याने राजा किंवा राणीला काय सांगावे?
मुख्य इन्स्पेक्टर: तुझा अर्थ काय आहे, "तू राजा किंवा राणीला काय सांगावे"? तो राजा आहे. त्याला आधीच माहित
आहे की आपण काय केले आहे, आणि जर आपण आलो नाही तर त्याला माहित होईल. त्याच्या कडे तुमच्या साठी चांगली ऑफर आहे.
पतलू: राजाने आम्हाला सोडले? बरं, हे आमच्या पळून जाण्याच्या योजनेला वळण देते, नाही काय?
मोटू: होय, मला असे वाटते की ते देते. मला वाटते की आपण त्याची ऑफर ऐकायला जावे. (मूठ बांधतो त्याच्या डोक्याला मारण्याची अपेक्षा करत परंतू पतलूच्या लक्षात येत नाही)

# मुख्य धडा

मत्तय **26-27**

तुम्ही पाहिजे आहात. तुम्हाला तुरूंगात टाकले आहे.
लोक तुम्हाला शोधत आहेत. तुम्ही पकडले गेले आणि तुम्हाला तुरूंगात टाकण्यात आले.
परंतू आता तुम्ही सोडविले गेले आहात! बरोबर; कोणी तरी तुम्हाला स्वतंत्र करण्यासाठी किंमत भरू केली आहे! परंतू तुम्हाला अजून वाटत नाही की तुम्ही सोडविलेले आहात, नाही काय? तुम्हाला अजूनही तुमचे पाप, खोटे बोलणे आणि तुमच्या चुका आठवतात. तुम्ही आणि तुमचे मित्र अजूनही जे तुम्ही हल्ली केले त्यासाठी संकटात असाल. खरंतर, घरी गेल्यावर तुम्हाला शिक्षा होवू शकते!
आजचे आपले पवित्र शास्त्रातील मुख्य वचन हे आहे, "परंतू देव आपल्यावरील स्वप्रीतीचे प्रमाण हे देतो की आपण पापी असतांना ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला." रोम 5:8
तुम्हाला पहिला धडा आठवतो काय? सर्वांनी पाप केले आहे, आपल्यातील प्रत्येकाने!
तुम्हाला काल आठवतो काय? आपल्याला सर्वांना पकण्यात आले आणि तुरूंगात टाकण्यात आले.
बरं, त्या पापासाठी वास्तविक किंमत भरली गेली. ते आजच्या नाटक/लघुनाटिके सारखे आहे, जिथे त्यांना तुरूंगातून सोडविण्यात आले आणि त्यांना ऑफर देण्यात आली.
तुम्ही कधीतरी काही तोडले किंवा चोरले त्याची किंमत भरून तुम्हाला कधी मैत्री पुनः प्रस्थापित करावी लागली काय? ज्या लोकांच्या वस्तूंचे नुकसान झाले आहे त्यांच्यासाठी ही सामान्य किंमत असू शकते.
बरं, देवाचीही आवश्यकता आहे की आपण किंमत भरावी. ज्या सर्वांनी पाप केले आहे त्यांनी देवा बरोबर त्यांचे संबंध पुन्हा स्थापित करण्याची आवश्यकता आहे.
परंतू देव खूप प्रेमळ आहे आणि आपले त्याच्या बरोबर संबंध पुनः स्थापित करावे म्हणून त्याने मार्ग तयार केला आहे.

येशू शेवटच्या जेवणासाठी त्याच्या शिष्यांबरोबर जे त्याचे सर्वात जवळचे मित्र होते त्यांच्या बरोबर एकत्र आला. त्या भोजनाच्या वेळेस दोन पुरूष होते जे येशूचा विश्वासघात करणार होते. भोजना नंतर यहूदाने येशूचा विश्वासघात केला आणि त्याला त्या लोकांच्या हातात पकडून दिले जे त्याला वधस्तंभावर मारणार होते. जेव्हा ते येशूचा न्याय सभेमध्ये न्याय करत होते तेव्हा पेत्राला कोणी तरी विचारले की तो येशू बरोबर होता काय. पेत्राने म्हटले, "नाही," एकदा नव्हे तर तीनदा! पेत्राने तिस-यांदा येशूला नाकारल्यावर कोंबडा आरवला, अगदी त्या प्रमाणे जसे येशूने भविष्य केले होते. ह्या दोघांनीही येशूचा विश्वासघात करून पाप केले. ह्या दोन्ही पापासाठी मरण आवश्यक होते, आपल्या पापा सारखेच.

ह्या दोन लोकांद्वारे येशूचा विश्वासघात झाल्यावर त्याच्या खटल्यासाठी मोठा लोकासमुदाय गोळा झाला. त्यांनी त्याच्या मरणदंडाची मागणी केली. जेव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला, तेव्हा तो मेला ह्यासाठी की आपल्याला आपल्या स्वतःच्या पापासाठी मरावे लागू नये. त्याचे मरण सर्वांना क्षमा करण्यासाठी पूरेसे होते कारण तो परिपूर्ण होता. येशूने आपण देवाबरोबर कसे संबंध ठेवतो हे बदलले. आता, परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करण्या ऐवजी आपल्याला निवड करायची आहे की आपण आपल्या पापासाठी त्याचे मरण स्वीकारू इच्छितो की नाही. त्याचे मरण आपली अपरिपक्वता झाकते!
यहूदा आणि पेत्र दोघांनीही पाप केले. यहूदाने येशूच्या बलिदानाचा स्वीकार न करण्याचे निवडले, परंतू पेत्राने त्याचा स्वीकार करणे निवडले. येशू मरण पावल्यानंतर मरणातून उठला, आणि त्याच्या शिष्यांना प्रगट झाला. तिस-यांदा पेत्राने येशूला पाहिले, तो मासे पकडत होता. येशू समुद्र किना-यावर दिसला आणि शिष्यांना लगेच कळले की तो होता. पेत्राने होडीतून उडी मारली आणि तो येशूकडे पोहत गेला. येशूने पेत्राला त्याच्या पापांची क्षमा केली आणि त्याला म्हटले, "माझ्या  मागे ये."
तुम्ही कोणाचे अनुकरण करण्याची निवड कराल? तुम्ही यहूदासारखे होण्याची निवड कराल काय ज्याने त्याचे स्वतःचे पाप वाहण्याची निवड केली, की तुम्ही पेत्रासारखे व्हाल ज्याने पाप केल्यावर येशू कडे परत जाण्याची व त्याचे अनुसरण करण्याची निवड केली?
येशू आपण केलेल्या पापासाठी मरण पावला आणि त्याने आपल्यासाठी देवाबरोबर पुनः संबंध जोडण्यासठी मार्ग तयार केला. आपणही येशूचे अनुसरण करू शकतो, आणि आपण पात्र असलेली शिक्षा आपण प्राप्त करणार नाही.
तुम्हाला ते आवडेल काय?
प्रार्थना करू या.
"येशू मला माझ्या पापांसाठी मरावे लागू नये म्हणून वधस्तंभावर मरण्यासाठी तुझे आभार. कृपाकरून माझ्या पापांची क्षमा कर. मी तुझे अनुसरण करील. आभार मानतो."
आजच्या नाटक/लघुनाटिके प्रमाणे तुम्ही आणि मी सुध्दा तुरूंगातून सोडविले गेला आहोत आणि पुनःस्थापित करण्याची ऑफर राजा कडून प्राप्त केली आहे. परंतू तो गोष्टीचा शेवट नाही. उद्या आपण अधिक नाटक पाहणार आहोत आणि देवाबद्दल शिकणार आहोत.

# वचन


" परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला."
रोमकरांस पत्र 5:8


# मतदान

येशूला कोणी मरण्यास सांगितले?

* पंतय पिलाताने त्याला मरणाची शिक्षा दिली. शिपायांनी ती शिक्षा पूर्ण केली.

* देवाने त्याला आपल्या पापांची किंमत भरण्यासाठी मरण्यास सांगितले. येशूने देवाची आज्ञा पाळली आणि मरण निवडले; त्याला कोणीही ते करायला लावले नाही.



# दिवस 3 विद्यार्थी पुस्तके

## मोठ्या मुलांसाठी प्रश्न व उत्तरे


**1. जामीन भरणे म्हणजे काय? वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी किती जामीन आवश्यक आहे?**
जामीन रक्कम ही हमी देण्याचा एक मार्ग आहे की आरोप लावलेली व्यक्ती न्यायालयात हजर होईल आणि पळून जाणार नाही आणि दोषी ठरू नये म्हणून लपेल. प्रत्येक देश वेगवेगळा राहील. यूएसए मध्ये प्रत्येक राज्य किमान आणि कमाल मार्गदर्शक तत्त्वे निर्देशित करते. हे अनेकदा नुकसानीच्या 10% ते 20% असते. प्रतिवादीला न्यायालयाच्या तारखेला हजर न राहण्याचा धोका असल्याचे दाखविल्यास ते खूप जास्त (किंवा नाकारले गेले) असू शकते. मत्तय 18:25-34

**2. येशूला काय द्यावे लागले? त्याला पैसे का द्यावे लागले? त्याचा गुन्हा काय होता?**
येशूने वधस्तंभावर मरणाद्वारे केलेल्या पापांची भरपाई केली. त्याला पैसे द्यावे लागण्याचे कारण म्हणजे देवाने त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि येशूला त्यांचा तारणारा म्हणून स्वीकारणाऱ्या सर्व लोकांना सोडवण्यासाठी त्याची योजना आखली होती. त्याने कोणताही गुन्हा केलेला नव्हता म्हणून तो जुन्या करारातील कायद्यांतील बलिदानासारखा होता ज्यासाठी त्यांनी अर्पण केलेले  कोकरू दोषरहित आणि परिपूर्ण होता.

**3. आज निरपराध लोकांना कधी दोषी ठरवून तुरुंगात टाकले जाते किंवा फाशीची शिक्षा दिली जाते का?**
दुर्दैवाने, होय, कधीकधी असे घडते. अशी उदाहरणे आहेत जेव्हा एखाद्या व्यक्तीने ख्रिस्ता ला नाकारण्यास नकार दिला म्हणून त्याला मारण्यात आले. मत्तय 10:33 "परंतु जो कोणी मला इतरांसमोर नाकारतो, मी माझ्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारतो." या शहीदांनी ख्रिस्त नाकारून आणि मारले जाऊ नये या पेक्षा ख्रिस्ती असल्याचे मान्य करणे पसंत केले. तथापि: इब्री 11:37 दर्शविते की हे नवीन नाही.

लपलेले 7 वधस्तंभ  शोधा आणि रेखाचित्र रंगवा.





8 फरक शोधा.

वधस्तंभाच्या या रेखांकनातील वधस्तंभ शोधा. तेथे 18 लपलेले आहेत.



# विद्यार्थी पुस्तके

## चक्रव्यूह

चित्रात निर्देश करणाऱ्या बाणापासून सुरवात करा आणि एक खुला मार्ग शोधा जो बाहेर जाणाऱ्या बाणाला ओलांडत नाही.

### प्रगत- कठिण



### मध्यम



### सोपे



## शब्दशोध

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | चो | र | भ | प | क्ष | व | ये | भ | स्तं | ध | व |
| व | जा | दा | अ | व | मा | मा | अ | प | र | दा | ब |
| भ | प | न्या | य | धी | श | प्रा | ता | भ | व | पे | मा |
| अ | र | मा | ब | जा | ता | र | ण | व | दो | ब | त्र |
| जा | ये | पा | प्रा | भ | व | र | अ | प | षी | दा | प्रा |
| प्रा | व | दा | ई | ये | मा | नु | मा | अ | जा | ता | पु |
| र्थ | प | न्या | र | क | स | ये | न्या | व | ये | न | व |
| ना | ता | अ | ड | र | व | दा | जा | जा | न | प्रा | प |
| अ | जा | ले | ण | मा | अ | ख | ये | दा | मी | भ | स्था |
| मा | ब | व | प | दा | स्त | वि | ता | प | ब | न | अ |
| अ | र | भ | ता | ख्रि | ब | ले | ये | भ | मा | व | जा |
| न्या | दा | णे | शु | दा | स्था | र | जा | प्रा | स्था | पि | त |
| प | अ | ये | ये | ब | लि | दा | न | व | ब | भ | प्रा |

दोषी
पकडले
जामीन
न्यायधीश
दाखविले
भरपाई
पुन
स्थापित
मारणे
वधस्तंभ
तारण
क्षमा
बलिदान
अनुसरण
प्रार्थना
पेत्र
येशुख्रिस्त
चोर

# घरगुती मातीसह पवित्र शास्त्र उजळणी

आजच्या आपल्या पवित्र शास्त्रातील गोष्टीसाठी घरगुती माती काढू या.
येशू शेवटच्या जेवणासाठी त्याच्या शिष्यांबरोबर जे त्याचे सर्वात जवळचे मित्र होते त्यांच्या बरोबर एकत्र आला. तुमच्या मातीने एक भाकर व ताट तयार करा. त्या भोजनाच्या वेळेस दोन पुरूष होते जे येशूचा विश्वासघात करणार होते. भोजना नंतर यहूदाने येशूचा विश्वासघात केला आणि त्याला त्या लोकांच्या हातात पकडून दिले जे त्याला वधस्तंभावर मारणार होते. जेव्हा ते येशूचा न्याय सभेमध्ये न्याय करत होते तेव्हा पेत्राला कोणी तरी विचारले की तो येशू बरोबर होता काय. पेत्राने म्हटले, "नाही," एकदा नव्हे तर तीनदा! पेत्राने तिस-यांदा येशूला नाकारल्यावर कोंबडा आरवला, अगदी त्या प्रमाणे जसे येशूने भविष्य केले होते. (तुमच्या मातीने कोंबडा तयार करा) ह्या दोघांनीही येशूचा विश्वासघात करून पाप केले. ह्या दोन्ही पापासाठी मरण आवश्यक होते, आपल्या पापा सारखेच.
ह्या दोन लोकांद्वारे येशूचा विश्वासघात झाल्यावर त्याच्या खटल्यासाठी मोठा लोकासमुदाय गोळा झाला. त्यांनी त्याच्या मरणदंडाची मागणी केली. जेव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला, तेव्हा तो मेला ह्यासाठी की आपल्याला आपल्या स्वतःच्या पापासाठी मरावे लागू नये. (आता मातीने वधस्तंभ तयार करा) त्याचे मरण सर्वांना क्षमा करण्यासाठी पूरेसे होते कारण तो परिपूर्ण होता. येशूने आपण देवाबरोबर कसे संबंध ठेवतो हे बदलले. आता, परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करण्या ऐवजी आपल्याला निवड करायची आहे की आपण आपल्या पापासाठी त्याचे मरण स्वीकारू इच्छितो की नाही. त्याचे मरण आपली अपरिपक्वता झाकते!
यहूदा आणि पेत्र दोघांनीही पाप केले. यहूदाने येशूच्या बलिदानाचा स्वीकार न करण्याचे निवडले, परंतू पेत्राने त्याचा स्वीकार करणे निवडले. येशू मरण पावल्यानंतर मरणातून उठला, आणि त्याच्या शिष्यांना प्रगट झाला. तिस-यांदा पेत्राने येशूला पाहिले, तो मासे पकडत होता. (आता तुमच्या मातीने होडी तयार करा.) येशू समुद्र किना-यावर दिसला आणि शिष्यांना लगेच कळले की तो होता. पेत्राने होडीतून उडी मारली आणि तो येशूकडे पोहत गेला. येशूने पेत्राला त्याच्या पापांची क्षमा केली आणि त्याला म्हटले, "माझ्या मागे ये."
तुम्ही कोणाचे अनुकरण करण्याची निवड कराल? तुम्ही यहूदासारखे होण्याची निवड कराल काय ज्याने त्याचे स्वतःचे पाप वाहण्याची निवड केली, की तुम्ही पेत्रासारखे व्हाल ज्याने पाप केल्यावर येशू कडे परत जाण्याची व त्याचे अनुसरण करण्याची निवड केली?
(विद्यार्थ्यांकडून माती परत घ्या.)



# खेळ **पाठांतर वचन वेळ**



फुगे फुगवा, पाठांतर वचनाच्या प्रत्येक शब्दासाठी एक. पर्मनंट मार्करने, प्रत्येक फुग्यावर पाठांतर वचनाचा एक शब्द  लिहा. पादर्शक टेपचा उपयोग करा फुगे भिंतीवर लावा. जर वेळ असेल, तर मुलं हे करण्यासाठी संधी घेऊ शकतात. जर तुम्ही वर्गाच्या वेळेस फुगे लावण्याची योजना कराल तर मुलांना तुम्ही फुगे लावत असतांना वचन वाचू द्या. सर्व फुगे जागेवर लावून झाले की, स्वयं सेवकांना कोणताही फुगा फोडण्यासाठी संधी घेऊ द्या (पिन चांगले काम करते.) आपण प्रत्येक वेळी जेव्हा फुगा फोडला जातो तेव्हा सर्वजण एकत्र वचन म्हणतात.

# फराळ **छोटे सॅन्डविच**



**।साहित्य:**

- ब्रेड
- काकडीचे
- काप
- टोमॅटो
- काप
- गाजर
- काप
- बटर
- टोमॅटो
- केचप मीठ

**सूचना:**

1. ब्रेडच्या बाजू छाटून घ्या आणि प्रत्येक स्लाइसचे चार तुकडे करा
2. काकडी, टोमॅटो आणि गाजरचे तुकडे वेगळ्या भांड्यात ठेवा
3. एका भांड्यात लोणी किंवा बटर ठेवा
4. मुले त्यांच्या आवडीच्या भाज्यांनी स्वत:चे मिनी सँडविच बनवू शकतात.
5. ब्रेडवर बटर लावा, टोमॅटो केचप लावा तुमच्या आवडीची भाजी लावा मीठ घाला
6. वर ब्रेडचा दुसरा तुकडा ठेवा आणि तुमच्या मिनी सँडविचचा आनंद घ्या.

# हस्तकला **पोलिस गाडी**





**साहित्य:**


-प्रत्येक विद्यार्थ्यासाठी पोलिस गाडी
-छापा
-कात्री
-रंगीत पेन
-रंगकांड्या किंवा रंगीत पेन्सील टेप


**छोट्या काड्या कृती:**


पायरी 1. पेट्रोल गाडीला रंग द्या तुमच्या भागात ती जशी दिसते तसे तिला सजवा पायरी 2. बिंदू रेषेवर कप
पायरी 3. मागे टेप लावून बारीक काडीवर गाडी चिटकवा.
पायरी 4. जेव्हा सर्वांचे संपेल तेव्हा विद्यार्थ्यांना सायरनचा आवाज करत त्यांच्या गाड्या त्या ठिकाणी चालवायला सांगा जिथे चोर लपलेले असतील असे त्यांना वाटते.

# हस्तकला 3 पोलिस गाडी



# 4 शिक्का मारला

## पवित्र शास्त्रातील गोष्ट: जक्क्य झाडावर चढतो

## नाटक/ लघुनाटिका

मोटू: ठिक आहे, त्यांच्यावर खून चिटकवली जात आहे.
पतलू: ज्या वस्तूंवर त्याला खून हवी होती त्या तिजोरीत वाट आहेत.
मोटू: तर आपल्याला फक्त त्याच्या सूचनांचे पालन करायचे आहे?
पतलू: होय, त्याने तसेच सांगितले.
मोटू: आपल्यासाठी त्याच्या कडे दुसरे काम असेल तो पर्यंत आपण येण्याजाण्यासाठी मोकळे आहोत.
पतलू: होय. मला असे वाटते की हे काम सुध्दा सोपे असेल. मग आपण जंगली आणि स्वतंत्र असू. (पक्ष्यासारखे हात हालवत)
मोटू: आपण फक्त हे शिक्के घेतो आणि नविन वस्तूंवर खून करतो आणि मग आतासाठी आपले काम झाले आहे?
पतलू: होय तेवढेच.
मोटू: छान! चल सुरवात करू या.
पतलू: तुला माहित आहे, मी विचार करत होतो....
मोटू: हो का?
पतलू: तुला माहित आहे की तो बेकरीचा दुकानदार असा दिसतो जणू काही सर्व काही नियंत्रणात?
मोटू: अरे, नाही.
पतलू: जसे की आपण त्याच्या कडून चोरी केली. त्याने नियंत्रण गमाविले नाही किंवा आपल्याला शाप दिला नाही किंवा आपल्याला मारले नाही किंवा आपल्याला मुख्य पोलिसा कडे दिले नाही.
मोटू: अरे हो.
पतलू : ते असे आहे जणू त्याला असे काही माहित आहे जे आपल्याला माहित नाही.
मोटू: अरे हो, आता तू सांगितले म्हणून. अनेक लोक आहेत ज्यांना अशा गोष्टी माहित आहेत ज्या मला माहित नाही.
पतलू: तू पुन्हा तसे म्हणू शकतो. तुला माहित आहे अजून कोण तसे आहे?
मोटू: टूक टुक चालक आणि नावी.
पतलू: आणखी?
मोटू: मी आणखी कोणाचा विचार करू शकत नाही.
पतलू: मुख्य इन्स्पेक्टर चे काय?
मोटू: अरे हो. तो देखील.
पतलू: (ठसा वर पकडत त्याच्या कडे पाहत) हे असे आहे जणू तू सांगू शकतो की शहरात कोणी कोणी राजाची ऑफर स्वीकारली आहे.
मोटू: तुला वाटते काय की आपणही तसे होणार आहोत?
पतलू: मला तुझ्या बद्दल माहित नाही, परंतू मी राजाची ऑफर स्वीकारल्या पासून माझ्या खांद्यावर पाहिले नाही किंवा मला अस्वस्थ किंवा चिंतीत वाटले नाही.
मोटू: अरे हो मी सुध्दा. कसे काय?
पतलू: मला पकडले जाण्याची भिती नाही.
मोटू: अरे हो.
पतलू: आपण आपल्या खांद्यावर पाहण्यात, आपली पाठ पाहण्यात आणि मुख्य इन्स्पेक्टर कडून पळण्यात किती वेळ घालविला.
मोटू: आपल्याला वाटले तेवढे आपण चांगले नव्हतो.
पतलू: नाही, आपण नक्कीच नव्हतो. आपल्याला वाटले आपण आहोत परंतू आपण चूक होतो.
मोटू: बरं, जेव्हा पासून आपण ऑफर स्वीकारली आहे आपल्याला कोणा कडूनही पळायचे किंवा लपायचे नाही.
पतलू: तेच आहे! असे आहे जणू ते शिक्का मारलेले आहेत, प्रमाण चिन्हाने प्रमाणित केलेले.
मोटू: मग आपण तसेच आहोत! कदाचीत मी तुला शिक्का मारला पाहिजे. (पतलू कडे डिंकफिरवत.)
पतलू: आपण नक्कीच आहोत. तू स्वतःला इजा करण्याआधी ती वस्तू खाली ठेव. हे काम पूर्ण करू या जेणे करून आपण मुख्य रस्त्याने शहरात जाऊ शकू.
मोटू: मुख्य रस्ता? आपण किती वर्षांपासून मुख्य रस्त्यावरून प्रवास केलेला नाही.
पतलू: पहिले चिन्ह कोणाला मिळेल ?

# मुख्य धडा

लूक **19:1-10**

तुम्ही पाहिजे आहात. तुम्हाला पकडण्यात आले व तुरूंगात टाकले गेले.
परंतू तुम्ही सोडविले गेले आहात!
आणि आज आपण जे आपले आहे त्यावर खून करने याबद्दल शिकणार आहोत!
पशुपालक त्यांच्या पशुधनाला त्यांच्या शिक्क्याने चिन्हांकित करतात जेणे करून जर एखादे भटकले आणि कोणाला सापडले तर, प्रत्येक प्राणी कोणाचा आहे ते सांगणे सोपे जाईल. जेव्हा कुत्रा किंवा गाडी हरवते तेव्हा तुम्ही तिला विचारू शकत नाही की तू कुठे राहते, जसे एखादे मूल हरवले तर पोलिस त्याला विचारतात की तू कुठे राहतो. पवित्र शास्त्र सांगते की आपण किंमत देऊन विकत घेतलेले आहोत. (1 करिंथ 6:20)
तुझी किंमत काय होती?
कालच्या धडयातून आठवण करा, की येशूने आपल्या पापांची किंमत भरली जेव्हा तो वधस्तंभावर मरण पावला. मग तुझी आणि माझी किंमत ती आहे! येशूचे मरण कष्टदायी होते. त्याने तुम्हाला सोडविण्यासाठी स्वस्त किंमत भरली नाही. तुमच्या कुटुंबाने कोणत्या मोलवान वस्तूची किंमत भरली आहे? कादाचित सायकल किंवा गाडी? त्याला चिन्हांकित केले जाते काय ह्यासाठी की त्याचे परिक्षण करता यावे आणि तुमच्या कुटुंबाच्या मालकीसाठी शोधता यावे? होय. प्रत्येक गाडीला विशेष क्रमांक असतो जो त्यावर लिहिला जातो आणि जो मालकाच्या नावाने नोंदणी केलेला असतो. कधी कधी लोक त्यांच्या नावाने किंवा एका क्रमांकाने त्यांच्या बाईकला चिन्हांकित करतात. त्या मूळे जर ती चोरली गेली तर ते अधिका-यांना चोराला पकडण्यासाठी मदत करू शकतात.
हे शिक्याचे उदाहरणं आहेत!
तुम्हाला मंगळवारची पवित्र शास्त्रातील गोष्ट आठवते काय? येशूच्या मागे जाणारा आणि तो जे बोलत आहे ते सर्व ऐकणारा एक जमाव होता. काल आपण ऐकले की जेव्हा येशूवर आरोप लावण्यात आले तेव्हा काय घडते हे पाहण्यासाठी ही एक मोठा जमाव होता. तुम्हाला माहित आहे काय? येशूच्या आजूबाजूला नेहमी गर्दी असायची.  त्याचे नाव जक्कय आहे, परंतू आपण त्याला जॅक म्हणू या. तो यरीहो मध्ये राहत होता. होय हे तेच शहर आहे ज्या बद्दल तुम्ही ऐकले जेव्हा यहोशवाने त्याच्या भिंती भोवती प्रदक्षीना घातली आणि देवाने त्या पाडल्या. येशू यरीहो शहरात आला आणि त्यातून जाणार होता जेव्हा जॅकने त्याच्या बद्दल ऐकले. त्याला येशूला पाहायचे व ऐकायचेच होते! तुम्हालाही पाहायचे असेलच!
तुमच्या सारखेच, जॅक खूप उंच नव्हता म्हणून त्याला समस्या होती. येशू कसा दिसतो हे तो कसे पाहू शकत होता? येशू जे बोलला ते तो कसे ऐकू शकत होता? येशूच्या सभोवती नेहमीच मोठी गर्दी असायची. ते मोठी मिरणूक पाहण्यासारखे आणि खूप उशीर होण्यासारखे होते. तुम्ही दोन मजली इमारतीच्या खिडकीतून रस्त्यावरून ते पाहणे छान नसते काय? लोकांच्या रांगेच्या मागून तुम्ही ज्यास्त काही पाहू शकत नाही! जॅक, ज्या रस्त्याने येशू येणार होता त्याच्या पुढे धावत गेला आणि त्याने एक झाड पाहिले आणि अधिक चांगल्या रितीने पाहण्यासाठी तो त्यावर चढला.
जेव्हा येशू झाडा जवळ आला तेव्हा तो थांबला आणि त्याने वर पाहिले आणि लहान माणसाल म्हटले," जक्कया, लवकर खाली ये. मला आज तुझ्या  घरी राहिलेच पाहिजे."  येशूचे त्याच्या घरी स्वागत करण्यासाठी जॅक खूप आनंदी होता.
खरंतर, त्याने तिथेच त्याच्या पापांचा पश्चाताप केला! त्याने येशूला म्हटले,"प्रभू पहा! इथे आणि आता मी माझी अर्धी संपत्ती गोर गरीबांना देतो, आणि जर मी अन्यायाने कोणा कडून काही घेतले असेल तर मी त्याच्या चार पट त्याला परत करीन." कोणाला तरी त्या चार वस्तू देण्याची कल्पना करा! त्याने त्रास झाला असेल! जॅक श्रीमंत होता, म्हणून जेव्हा त्याने म्हटले की तो त्याच्या मालकीची अर्धी संपत्ति गरीबांना देईल तेव्हा तो लहान रक्कमे बद्दल बोलत नव्हता. त्याच्या घराच्या बाहेरील लोक येशू त्याची भेट घेत आहे ह्या बद्दल कुरकुर व कुजबुज करत होते. तो पापी होता, एक वाईट मनुष्य, फसविणारा आणि कर घेणारा. येशूच्या भेटी मूळे जॅक पूर्णपणे बदललेला मनुष्य होता. तो झाडाच्या छोटया फांदयांनी लपलेला होता तरी, येशूने त्याला का निवडिले?
येशूने त्याला सांगितले, "मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधावयास व तारावयास आला आहे." येशूने समजाविले की ज्या प्रत्येकाला माहित आहे की तो हरवलेला आहे आणि तारणाची गरज आहे त्याला तो तारण देऊ इच्छितो. जॅकने त्या दिवशी येशूचा स्वीकार केला. त्याचे अचानक औदार्य ह्याचे प्रमाण होते की तो पूर्णपणे बदलला आहे. तो गायी वरच्या शिक्क्या सारखा होतो; ते दाखवत होते की तो आता देवाचा आहे. तो शारीरिक रित्या शिक्का मोतर्ब नव्हता परंतू लोक ख-या रितीने बदल पाहू शकत होत. ते नाटक/लघूनाटिके सारखे होते, जेव्हा मोटू आणि पतलू  इतरांमध्ये काही तरी वेगळे पाहू शकत होते.
जेव्हा तुम्ही तुमच्यासाठी आणि तुमच्या पापांसाठी येशूने किंमत भरवी हे स्वीकारता तेव्हा तुम्ही त्याचे होता. तुम्ही त्याचे आहात ह्याचा पूरावा म्हणून तो तुम्हाला पवित्र आत्मा देईल. पवित्र आत्मा तुम्हाला तुमच्या पापाची जाणीव करून देईल् आणि क्षमा मागण्यासाठी आणि जेव्हा तुम्ही वाईट गोष्टी करता तेव्हा स्वीकारण्यासाठी मदत करील. तो तुम्हाला देवाजवळ राहण्यासाठी आणि ख्रिस्ती म्हणून वाढण्यासाठी मदत करील.
तुमच्या पैकी किती जण येशूला हृदयात घेण्यासाठी प्रार्थना करू इच्छिता? तुमच्या चुकीच्या कृत्यांसाठी त्याचे वधस्तंभावरील मरण ह्याचा तुम्ही स्वीकार करू इच्छिता काय? तुम्ही वेगळे व बदललेले आहात हे इतरांनी पाहावे असे तुम्हाला वाटत असेल तर तुमचा हात वर करा.
प्रार्थना करू या.
"प्रभू देवा, मी परिपूर्ण नाही आणि मला मदतीची गरज आहे. माझी इच्छा आहे की जसे येशूने जॅकला शोधले तसे त्याने मला शोधावयास यावे. येशू, तू आज माझ्या  हृद्या त येशील काय? येशू, मी तुझा होऊ इच्छितो आणि माझ्या  बाकीच्या जीवनात तुझे अनुकरण करण्यासाठी मदत मिळवू इच्छितो. मी तुझे अनुसरण करण्याची निवड करतो."

# वचन


" की, येशू प्रभू आहे असे जर 'तू आपल्या मुखाने' कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा 'आपल्या अंत:करणात' विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल."
रोमकरांस पत्र 10 :9

# मतदान

तुम्हाला काय वाटते?

* केवळ येशूला पाहण्यासाठी जॅकने झाडावर चढणे योग्य होते.

* जॅकने अधिक धैर्यान होऊन सरळ येशू कडे जायला हवे होते.




| | केवळ येशूला पाहण्यासाठी जॅकने झाडावर चढणे योग्य होते. | जॅकने अधिक धैर्यान होऊन सरळ येशू कडे जायला हवे होते. |
|---|---|---|
| सोपे | | |
| मध्यम | | |
| कठिण | | |
| प्रगत | | |



# दिवस 4 विद्यार्थी पुस्तके


## मोठ्या मुलांसाठी प्रश्न व उत्तरे

**1. तुमचे तारण होण्यासाठी आणि स्वर्गात जाण्यासाठी तुम्ही पुरेसे चांगले असू शकता का?**
त्यासाठी काय आवश्यक आहे? कोणीही नीतिमान नाही. (रोम 3:23) कोणीही पुरेसे चांगले नाही. (रोम 10:9) यावर विश्वास ठेवणे आणि तुमचा विश्वास तोंडाने घोषित करणे आवश्यक आहे.

**2. तुम्हाला जे पहायचे आहे ते पाहण्यासाठी तुम्ही कधी खूप कमी पडले काय? केव्हा आणि कुठे?**
संभाव्य अनुभवांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो: स्पोर्ट्स खेळ  जेव्हा तुमच्या समोर लोकांसोबत उभे असता, परेड, दुकानातील शोभा इ. त्यामुळेच अनेकदा ब्लीचर्स बांधले जातात जेणेकरून जास्त लोक चांगले पाहू शकतील, जसे की जक्कयाला  हवे होते. विद्यार्थ्यांना जक्क्यशी संबंधित असण्यास मदत करा आणि तो काय विचार करत होता आणि त्याला काय वाटत होते हे समजून घ्या.

**3. कल्पना करा की आज येशू तुमच्या घरी येत आहे, तुमचे विचार आणि चिंता काय आहेत? तो आज लोकांना असे म्हणतो असे तुम्हाला वाटते का? चर्चला जाणे म्हणजे त्याच्या घरी जाण्यासारखे आहे का? तेथे कोणी येशूला भेटू शकतो का? जक्कय येशूला भेटायला गेला नसता तर परिणाम वेगळा असता काय ?**
शिक्षकांनो, सर्व उत्तरे स्वीकारा आणि विद्यार्थ्यांना अध्यात्मिक असल्याचा आव न आणता खरे  होण्यासाठी प्रोत्साहित करा. उदाहरण: मी काय घालू शकतो? माझ्या लहान भावाकडे  सगळीकडे खेळणी असतील आणि खूप आवाज येईल का? त्याला आवडेल असे आपण काय स्वयंपाक करू  शकतो?


**5** फरक शोधा



चित्र रंगवा.



या दहा वाड्यापैकी फक्त दोनच वाडे अगदी सारखेच आहेत. त्यांना शोधा आणि वर्तुळ करा.




# विद्यार्थी पुस्तके


## चक्रव्यूह

चित्रात निर्देश करणाऱ्या बाणा पासून सुरवात करा आणि एक खुला मार्ग शोध जो बाहेर जाणाऱ्या बनला ओलांडत नाही.


### प्रगत- कठिण



### मध्यम



### सोपे



### शब्दशोध

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऐ | चो | बु | पो | लि | स | च | म | ऐ | चो | च |
| क | च | पो | कि | ऐ | स्वी | मा | कि | रा | प | कि |
| णा | म | मा | चो | पो | ग | ज | बु | हा | णी | मा |
| रे | बु | म | च | र्दी | ज | म | क्क | ज | स्वी | म |
| कि | च | हा | म | पो | मा | रा | च | य | बु | पो |
| स्वी | पो | ल | बु | स्वी | बु | कि | जा | ऐ | कि | मा |
| मा | म | मा | का | ज | म | पो | चो | बु | च | यन् |
| प | चो | र | च | चो | मा | आ | बु | ट | म | क |
| च | वि | पो | म | च | कि | च | त्मा | का | च | र |
| चो | मा | त्र | बु | म | ढ | ज | चो | ऐ | स्वी | णे |
| बु | झा | च | त | बु | मा | णे | च | म | मा | चो |
| मा | ड | म | स्वी | कि | ऐ | ाप | चो | र | ले | पो |
| कि | पो | ऐ | चो | ज | भू | प्र | च | कि | स्वी | म |

राणी
महाल
राजा
किमत
चोरले
स्वीकार
मान्यकरणे
पोलिस
गर्दी
चढणे
झाड
पहा
बुटका
ऐकणारे
पवित्र
आत्मा
प्रभू
जक्कय

# घरगुती मातीसह पवित्र शास्त्र उजळणी

आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीसाठी माती काढू या.


प्रथम तुमच्या मातीने गाय तयार करा आणि त्याला तुमच्या नखाने शिक्का मारा. (ब्रँड सारखे) त्या शिक्क्यामूळे ती गाय तुमच्या मालकीची झाली! तुम्हाला मंगळवारची पवित्र शास्त्रातील गोष्ट आठवते काय? येशूच्या मागे जाणारा आणि तो जे बोलत आहे ते सर्व ऐकणारा एक जमाव होता. काल आपण ऐकले की जेव्हा येशूवर आरोप लावण्यात आले तेव्हा काय घडते हे पाहण्यासाठी ही एक मोठा जमाव होता. तुम्हाला माहित आहे काय? येशूच्या आजूबाजूला नेहमी गर्दी असायची. आता, तुमच्या खेळण्याच्या पीठाने एक छोटा मनुष्य तयार करा. त्याचे नाव जक्कय आहे, परंतू आपण त्याला जॅक म्हणू या. तो यरीहो मध्ये राहत होता. होय हे तेच शहर आहे ज्या बद्दल तुम्ही ऐकले जेव्हा यहोशवाने त्याच्या भिंती भोवती प्रदक्षीना घातली आणि देवाने त्या पाडल्या. येशू यरीहो शहरात आला आणि त्यातून जाणार होता जेव्हा जॅकने त्याच्या बद्दल ऐकले. त्याला येशूला पाहायचे व ऐकायचेच होते! तुम्हालाही पाहायचे असेलच!
आता थोडी माती बाजूला ठेवत तुमच्या मातीने मोठे झाड तयार करा.
तुमच्या सारखेच, जॅक खूप उंच नव्हता म्हणून त्याला समस्या होती. येशू कसा दिसतो हे तो कसे पाहू शकत होता? येशू जे बोलला ते तो कसे ऐकू शकत होता? येशूच्या सभोवती नेहमीच मोठी गर्दी असायची. ते मोठी मिरणूक पाहण्यासारखे आणि खूप उशीर होण्यासारखे होते. तुम्ही दोन मजली इमारतीच्या खिडकीतून रस्त्यावरून ते पाहणे छान नसते काय? लोकांच्या रांगेच्या मागून तुम्ही ज्यास्त काही पाहू शकत नाही! जॅक, ज्या रस्त्याने येशू येणार होता त्याच्या पुढे धावत गेला आणि त्याने एक झाड पाहिले आणि अधिक चांगल्या रितीने पाहण्यासाठी तो त्यावर चढला.
थोडया मातीने एक चेंडू तयार करा आणि त्याला डोक्याचा आकार द्या व ते तुमच्या झाडावर ठेवा. (जॅकला फांद्या मधून बाहेर पाहून येशूला पाहू द्या) जेव्हा येशू झाडा जवळ आला तेव्हा तो थांबला आणि त्याने वर पाहिले आणि लहान माणसाला म्हटले," जक्कया, लवकर खाली ये. मला आज तुझ्या घरी राहिलेच पाहिजे." आता जॅकवर एक मोठय हस्य तयार करा आणि त्याला झाडाच्या बाहेर काढा. येशूचे त्याच्या घरी स्वागत करण्यासाठी जॅक खूप आनंदी होता.
खरंतर, त्याने तिथेच त्याच्या पापांचा पश्चाताप केला! त्याने येशूला म्हटले,"प्रभू पहा! इथे आणि आता मी माझी अर्धी संपत्ती गोर गरीबांना देतो, आणि जर मी अन्यायाने कोणा कडून काही घेतले असेल तर मी त्याच्या चार पट त्याला परत करीन." तुमच्या खेळण्याच्या पीठाचा उपयोग करून तुमची सर्वात आवडती वस्तू तयार करा. कोणाला तरी त्या चार वस्तू देण्याची कल्पना करा! त्याने त्रास झाला असेल! जॅक श्रीमंत होता, म्हणून जेव्हा त्याने म्हटले की तो त्याच्या मालकीची अर्धी संपत्ति गरीबांना देईल तेव्हा तो लहान रक्कमे बद्दल बोलत नव्हता.
त्याच्या घराच्या बाहेरील लोक येशू त्याची भेट घेत आहे ह्या बद्दल कुरकुर व कुजबुज करत होते. तो पापी होता, एक वाईट मनुष्य, फसविणारा आणि कर घेणारा. येशूच्या भेटी मूळे जॅक पूर्णपणे बदललेला मनुष्य होता.
तुमच्या मातीने जॅक तयार करा व त्याला आनंदी चेहरा द्या. तो झाडाच्या छोटया फांदयांनी लपलेला होता तरी, येशूने त्याला का निवडिले?
येशूने त्याला सांगितले, "मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधावयास व तारावयास आला आहे." येशूने समजाविले की ज्या प्रत्येकाला माहित आहे की तो हरवलेला आहे आणि तारणाची गरज आहे त्याला तो तारण देऊ इच्छितो. जॅकने त्या दिवशी येशूचा स्वीकार केला. त्याचे अचानक औदार्य ह्याचे प्रमाण होते की तो पूर्णपणे बदलला आहे. तो गायी वरच्या शिक्क्या सारखा होतो; ते दाखवत होते की तो आता देवाचा आहे. तो शारीरिक रित्या शिक्का मोतर्ब नव्हता परंतू लोक ख-या रितीने बदल पाहू शकत होत. ते नाटक/लघूनाटिके सारखे होते, जेव्हा मोटू आणि पतलू इतरांमध्ये काही तरी वेगळे पाहू शकत होते.
जेव्हा तुम्ही तुमच्यासाठी आणि तुमच्या पापांसाठी येशूने किंमत भरवी हे स्वीकारता तेव्हा तुम्ही त्याचे होता. तुम्ही त्याचे आहात ह्याचा पूरावा म्हणून तो तुम्हाला पवित्र आत्मा देईल. पवित्र आत्मा तुम्हाला तुमच्या पापाची जाणीव करून देईल् आणि क्षमा मागण्यासाठी आणि जेव्हा तुम्ही वाईट गोष्टी करता तेव्हा स्वीकारण्यासाठी मदत करील. तो तुम्हाला देवाजवळ राहण्यासाठी आणि ख्रिस्ती म्हणून वाढण्यासाठी मदत करील.
आता मातीने स्वत:ला तयार करा. आपण प्रार्थना करणार आहोत, आणि आजच्या गोष्टीत जॅक ने केले तसे जर तुम्ही येशूचा अनुयायी होण्याची निवड करता तर, तुम्ही खेळण्याच्या पीठाणे तयार केलेल्या स्वतः वर वधस्तंभ "शिक्का" काढा हे दाखविण्यासाठी की तुम्ही देवाचे आहात.
(मुलांकडून माती परत घ्या.)

# खेळ पाठांतर वचन वेळ



मुलांना जमीनीवर गोल बसू द्या. वचन फळयावर किंवा कागदाच्या तुकडयावर लिहा जिथे मुलं ते पाहू शकतात. मग मुलांना पोलिसाचा तारा किंवा हातकडी त्यांच्या बाजूच्या मुलाला देऊ द्या. जो कोणी तारा किंवा हातकडी धरतो तो वचनाचा पुढील शब्द म्हणतो. गोष्टी अधिक कठिण करण्यासाठी, मुलांना तर किंवा हातकडी गोलातील कोणत्याही मुलाकडे वचनाचा पुढील शब्द बोलण्यासाठी फेकू द्या.

# फराळ फळाचे कबाब



**साहित्य:**

- 2 संत्री
- 2 केळी
- 1 वाटी द्राक्षे
- 1 लहान पपई लहान तुकडे करा
- 1 लहान पाणी खरबूज लहान तुकडे करा टूथपिक्स चाट मसाला
- 2 चमचे

(टीप: वरील फळे वापरण्याची सूचना दिली आहे परंतु आपण स्थानिकरित्या उपलब्ध असलेली फळे बदलू शकता. तुमच्या आवडीची फळे. फक्त दोन ते तीन वेगवेगळ्या रंगांची फळे वापरणे लक्षात ठेवा. जर तुम्ही मोठ्या गटाला देत असाल तर अधिक फळ द्या.)

**सूचना:**

1. सर्व फळे सोलून लहान तुकडे करा आणि वेगळ्या भांड्यात ठेवा
2. प्रत्येक मुलाला टूथ पिक्स द्या आणि त्यांना स्वतःचे कबाब बनवू द्या, चाट मसाला शिंपडा आणि तुमच्या स्वतःच्या फळांच्या कबाबचा आनंद घ्या.

फराळ

# हस्तकला




**साहित्य:**

-प्रत्येक लेन्ससाठी ट्यूबची चापिलेली प्रत
-कात्री -रंगीत पेन
-रंगकांडया किंवा रंगीत पेन्सिल
-डिंक
-कुरळी रिबन
-पेपर

**पंच सूचना:**

पायरी 1. दुर्बीण आणि दोन कागदाच्या पट्ट्या रंगवा, तुमच्या आवडीनुसार सजवा. पायरी 2. बिंदू रेषेवर दुर्बिणी आणि पट्ट्या कापून टाका पायरी
पायरी 3. दोन दुर्बिणीच्या नळ्या गुंडाळा आणि टॅबला चिकटवा पायरी
पायरी 4. लहान पट्ट्या झिगझॅग अशा दुमडा. (पुढे आणि पुढे 3 वेळा) पायरी
पायरी 5. दाखवल्याप्रमाणे नळ्यांच्या बाजूंना पट्ट्या चिकटवा, जेणेकरून तुम्ही तुमच्या डोळ्यांना दुर्बीण बसवण्यासाठी नळ्या जोडू शकता आणि वेगळे करू शकता. पायरी
पायरी 6. ट्यूबमध्ये छिद्र पाडा, जिथे कागद ओव्हरलॅप होतो (सर्वात मजबूत जागा) प्रत्येक नळीच्या बाहेर कुरळी रिबन बांधा जेणेकरून विद्यार्थ्यांच्या गळ्यात दुर्बीण घालता येईल

## हस्तकला 4
## दुर्बिण

इथे चिटकवा

इथे चिटकवा

**" की, येशू प्रभू आहे असे जर 'तू आपल्या मुखाने' कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा 'आपल्या अंत:करणात' विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल." रोमकरांस पत्र 10 :9**

Equip & Grow
मुले महत्वपूर्ण आहेत

इथे चिटकवा

चोर पोलिस व्हीबीएस

# 5 नियुक्ती

## पवित्र शास्त्रातील गोष्ट: शिष्य माणसे धरणारे होतात

## नाटक/ लघुनाटिका

मुख्य इन्स्पेक्टर : अरे बंधूनो! (हाताने तोंड झाकणारे, "चोर")
पतलू : कसे काय मुख्य इन्स्पेक्टर.
मोटू :अहो!
मुख्य इन्स्पेक्टर : तुमचा दिवस कसा जात आहे?
पतलू : ठिक, खूप चांगला नाही, पण ठिक.
मोटू :होय हा दिवस ठिक आहे.
मुख्य इन्स्पेक्टर : ठिक? तुमच्या लक्षात आहे काय की एक आठवडया आधी मी तुमची लपण्याची जागा शोधली, आणि मी तुम्हाला तुमच्या अधिक गुन्हयांसाठी जे तुम्हाला स्वत:ही आठवत नव्हते त्यासाठी तुरूंगात टाकणार होतो, बरोबर?
पतलू : होय, मला आठवते.
मोटू :आम्ही नक्कीच त्या पेक्षा चांगले करत आहोत.
मुख्य इन्स्पेक्टर: मला असे वाटते.
पतलू : तुला माहित आहे, तुम्ही आम्हाला कधीच विचारले नाही की आम्ही राजाची ऑफर स्वीकारली की नाही.
मुख्य इन्स्पेक्टर : तुम्हाला वाटले होते काय की मी सांगू शकणार नाही? तुम्ही तसे करण्याआधी मला माहित होते की तुम्ही त्याची ऑफर स्वीकारणार आहे. आणि त्यालाही माहित होते.
पतलू : होय, त्याने आम्हाला त्याच्यासाठी केवळ एक गोष्ट करायला सांगितली.
मोटू :आम्हाला वाटते की कदाचीत तो आम्हाला त्याच्यासाठी काही ज्यास्त काम करायला लावेल.
मुख्य इन्स्पेक्टर : माझ्या कडे तुमच्यासाठी राजाकडून नविन कामगीरी आहे.
पतलू : ओह, ठिक आहे, ते काय आहे? आम्ही तयार आहोत. (पक्ष्या सारखे हात पसरत) जंगली आणि स्वतंत्र.
मुख्य इन्स्पेक्टर : शहराच्या दक्षिण भागात चोरांचा एक समूह आहे जो त्रास देत आहे.
पतलू : मी माझ्या तिक्ष्ण नजरेने त्यांना शोधावे अशी तुमची इच्छा आहे काय?
मोटू : होय, आणि माझ्या शोध घेण्याच्या चांगल्या क्षमतेने?
पतलू : आम्ही चांगले शिकारी आहोत, तुम्हाला माहित आहे.
मुख्य इन्स्पेक्टर : तुम्हाला ते आज रात्री ढिगाच्या जवळ पुला खाली मिळतील.
मोटू :तर आम्ही त्यांच्या बरोबर काय करावे अशी तुमची इच्छा आहे?
मुख्य इन्स्पेक्टर : माझी इच्छा आहे की तुम्ही त्यांच्याकडे राजाकडून ऑफर घेऊन जावे.
पतलू : ते ऑफर ऐकतील काय?
मुख्य इन्स्पेक्टर : जर ते थोडेही तुमच्या सारखे असतील तर नाही.
पतलू : आमच्या सारखे?
मुख्य इन्स्पेक्टर : जेव्हा तुम्ही बेकरी दुकान लुटले, तेव्हा दुकानदाराने तुम्हाला ऑफर दिली.
मोटू :त्याने म्हटले की आम्ही स्वत: शरण जावे.
मुख्य इन्स्पेक्टर: होय, ती तुमची पहिली ऑफर होती.
पतलू : ओह, ती न्याधीश, बेकरी मालक, राजाकडून आली?
मुख्य इन्स्पेक्टर : आपण निश्चितपणे त्याला लगेच पकडू नये. अरे, इथे तुम्हाला याची गरज आहे.
पतलू :बिल्ले? ते खेळण्याच्या ताऱ्या सारखे दिसतात.
मोटू : तुम्ही काय करण्याचा प्रयत्न करत आहे पोलिस?
मुख्य इन्स्पेक्टर : मला काही मदतनीस पाहिजे. हुकुमना वाटले की तुम्हाला शहराच्या काही चांगल्या लोकांना ऑफर देण्यात रूची असेल.
मोटू :आम्हाला लोकांना अटक करायला मिळेल काय? ह्या ताऱ्याचा अर्थ हा आहे काय की आम्ही "आज साठी पोलिस आहोत"
मुख्य इन्स्पेक्टर : कधी कधी. राजा, न्यायी आहे आणि तो संदेश देऊ इच्छित आहे की त्याला न्याय हवा आहे. तुम्ही त्या योजनेचा भाग आहात. त्याच्याकडे ज्या लोकांसाठी ऑफर आहे त्याची यादी आहे. आपण ते सांगण्यासाठी योग्य वेळ पाहू या.

# मुख्य धडा

लूक **5:1-11**

तुम्ही पाहिजे आहात. तुम्हाला तुरूंगात टाकले होते. तुमची सुटका केली गेली. तुमच्यावर शिक्का मारण्यात आला आहे. आज आपण नेमणूक होणे ह्या बद्दल बोलत आहोत! होय ते बरोबर आहे; येशूकडे तुमच्यासाठी काम आहे! "परंतू, मी त्यासाठी तयार नाही," असे तुम्ही म्हणाल? बरं, येशूने तुमचा उपयोग करण्यासाठी तुमची निवड केली आहे. अनेक लोक आहेत ज्यांनी हे ऐकण्याची गरज आहे की येशू त्यांना सुध्दा त्याचे अनुसरण करण्यासाठी सांगत आहे.

तुमचे मित्र आहेत जे असा विश्वास ठेवतात की त्यांना देवासाठी चांगले व्हायचे आहे. परंतू ते खरे नाही. तुम्हाला धडा आठवतो काय? येशू आजारी लोकांसाठी मरण पावला, निरोगी लोकांसाठी नव्हे. म्हणून जो पर्यंत आपण विचार करतो की आपण निरोगी आहोत आणि आपल्या स्वतःच्या शक्तिने चांगले होण्याचा प्रयत्न करत आहोत, तो पर्यंत आपण पूर्ण मुद्दा गमावित आहोत!
देवाची इच्छा नाही की आपण पूरेसे चांगले व्हावे. त्याची इच्छा आहे की आपण हे स्वीकारावे की आपण पापी आहोत आणि येशूला आपल्या पापाची किंमत भरू द्यावी.

आज आपले पवित्र शास्त्रातील मुख्य वचन आहे, "तर ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही त्याचा धावा ते कसा करितील? आणि ज्याच्याविषयी त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? आणि घोषणा करणा-यांवचून ते कसे ऐकतील?
म्हणून तुमच्यासाठी हा प्रश्न आहेः जर तुम्ही सांगणार नाही तर तुमचे मित्र येशू बद्दल कसे ऐकतील?
तुमच्याकडे कधी काही चांगली बातमी होती काय जी तुम्ही कोणाला तरी सांगू इच्छित होते? काय झाले ते त्यांना सांगण्यासाठी तुम्ही थांबू शकत नव्हते. बरं, देवाने आपल्याला काही महान बातमी दिली. आपल्याला आपल्या स्वतःच्या पापांची किंमत भरायची नाही; येशूने ते करण्याची इच्छा दर्शविली आहे. म्हणून जर तुम्ही त्यांना सांगणार नाही तर तुमचे मित्र कसे ऐकतील?

एका दिवशी, येशू गालील समुद्राजवळ उभा होता, आणि देवाचे वचन ऐकण्यासाठी त्याच्या भोवती एक जमाव गोळा झाला होता.  जशी गर्दी मोठी झाली, येशूला खात्री करायची होती की सर्वजण त्याचे ऐकू शकतील. तो पेत्राच्या बोटीवर चढला आणि तिला थोडे बाहेर काढले. मग तो खाली बसला आणि त्यांना बोटीतून शिकवू लागला. जेव्हा येशूने शिकविणे संपविले, तेव्हा त्याने पेत्राला आत येऊन त्याच्या बरोबर मासे पकडण्यासाठी जाण्यास सांगितले. पेत्राने पूर्ण रात्र काम केले होते परंतू तो तरीही बोटीत चढला. जेव्हा मासेमारांनी (पेत्रानेही) त्यांचे जाळू खाली टाकले, तेव्हा ते जास्तीत ज्यास्त भरले आणि जाळी तुटु लागली! पेत्र, याकोब आणि योहान त्यांनी पकडलेले मासे पाहून आश्चर्यचकीत झाले. पेत्र गुडघ्यावर झाला आणि म्हणाला,"प्रभू माझ्या पासून दूर जा, मी पापी मनुष्य आहे!" त्यांना तिथेच सोडण्याऐवजी येशू त्यांना म्हणाला, "घाबरू नका; आता पासून तुम्ही माणसे धरणारे व्हाल."येशूने आपल्याला सुर्वाता सांगण्यास सांगितले आहे की तो पापांसाठी मरण पावला आणि देवाबरोबर संबंध पुनः प्रस्थापित करण्यासाठी त्याने आपल्यासाठी मार्ग तयार केला आहे. जेव्हा आपण येशूचे अनुसरण करतो, तेव्हा आपण आपले मित्र, कुटुंब आणि शेजारी हयांच्या बरोबर सुर्वाता वाटणारे लोक होवू. तुम्हाला ते आवडेल काय? प्रार्थना करू या."येशू, मला सुर्वाता दिल्याबद्दल आभारी आहे जी मी माझे मित्र व कुटुंब हयांच्या बरोबर वाटू शकतो. मी तुझी आज्ञा पाळेल. मी तुझ्या  बद्दल इतरांना सांगण्याची निवड करतो. मला मदत करण्यासाठी तुझे आभार मानतो."
आजच्या आपल्या नाटक/लघूनाटिके प्रमाणे, तुम्हाला आणि मला नेमण्यात आले आहे! परंतू तो गोष्टीचा शेवट नाही. येशूने आपल्याला माणसे धरणारे होण्यास सांगितले आहे. इतरांबरोबर वाटण्यासाठी आपल्या जवळ सुर्वाता आहे.

सर्व पाच वचनं एकत्र म्हणू या.


1. रोम 3:23 "कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत."
2. रोम 6:23 "कारण पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपलया प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे."
3. रोम 5:8 "परंतू देव आपणांवरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतांना ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला."
4. रोम 10:9 "कारण जो अंतकरणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करितो त्याचे तारण होते."

5 रोम 10:14ब "... आणि ज्याच्याविषयी त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? आणि घोषणा करणा-यांवाचून ते कसे ऐकतील?"

# वचन

“ र ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही त्याचा धावा ते कसा करतील? ज्याच्याविषयी त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? घोषणा करणाऱ्यांवाचून ते कसे ऐकतील?” रोमकरांस पत्र 10: 14

# मतदान




पहिल्या शतकात जेव्हा गोष्ट त्यांच्यासमोर घडत होती तेव्हा ते जिवंत होते आणि शिष्यांना पाहत होते अशी कल्पना करण्याचे विद्यार्थ्यांना आव्हान द्या. कल्पना करणे चांगले आहे की ते शिष्यांपैकी एक असल्यास, त्यांना वैयक्तिकरित्या कसे वाटेल?जेव्हा येशूने म्हटले,“आता पासून तुम्ही माणसे धरणारे व्हाल” असे म्हटले तेव्हा शिष्यांना ते समजले काय?

* बोटीतील लोकांना हे समजत नव्हते की त्यांच्या मासे धरण्याच्या जाळयासह त्यांनी लोकांना पाण्या बाहेर कसे काढावे

.* बोटीतील लोकांना हे कळले की त्यांनी मासे धरणे सोडावे आणि लोकांना तारण कसे व्हावे हे सांगणे शिकावे.



# दिवस 5 विद्यार्थी पुस्तके


## मोठ्या मुलांसाठी प्रश्न व उत्तरे

**1. जेव्हा येशूने पेत्राला सांगितले की, "आतापासून तू माणसे धरणारा होशील" तेव्हा त्याचा अर्थ काय?**
उत्तर: त्याने पेत्राला सांगितले की त्याचा पेशा बदलणार आहे आणि आतापासून; तो बोटीवर काम करणार नाही. येशूची इच्छा होती की त्याने जाऊन सर्वांना येशूबद्दल सांगावे. जेव्हा कोणी येशूबद्दल त्याच्यावर विश्वास ठेवतो, तेव्हा ते मोठ्या प्रमाणात मासे पकडण्या इतके महान होणार होते.


**2. येशूवर विश्वास ठेवल्यानंतर आपण काय करावे अशी त्याची इच्छा आहे याचे वर्णन करा?**
उत्तर: "म्हणून जा आणि सर्व राष्ट्रांना शिष्य करा" ...." मी तुम्हांला सांगितलेल्या सर्व गोष्टी पाळण्यास त्यांना शिकवा." (मत्तय 28:19 , 20) येशूबद्दल आणि त्याने केलेल्या कृत्यांबद्दल आपला काय विश्वास आहे हे आपण सर्वांनी इतरांना सांगावे अशी त्याची इच्छा आहे.

**3. जर एखाद्या मित्राने तुमचे ऐकले आणि तुम्ही त्यांना येशूबद्दल जे सांगत आहात त्यावर विश्वास ठेवला तर तुम्ही पुढे काय कराल?**
उत्तर: तुमच्या मित्राला येशूला त्यांचा प्रभु आणि तारणहार म्हणून स्वीकारण्यासाठी आणि त्यांच्या पापांची क्षमा करण्यासाठी तुमच्यासोबत प्रार्थना करण्यास सांगा. शिक्षकांनो, तुमच्याकडे वेळ असल्यास, मुलांसोबत एका साध्या तारणाच्या प्रार्थनेचा सराव करा आणि त्यांना एकमेकांसोबत सराव करण्यास प्रवृत्त करा.

प्रतिमा अव्यवस्थित आहे. या डब्यात, प्रत्येक संख्या कुठे असावी ते लि



"मी तुला माणसे धरणारे करीन." या प्रत्येकाला पकडण्यासाठी तुम्ही काय वापरता?




# विद्यार्थी पुस्तके


## चक्रव्यूह

चित्राकडे निर्देशित करणाऱ्या बाणापासून सुरवात करा आणि एक खुला मार्ग शोधा जो बाहेर जाणाऱ्या पर्यंत कोणत्याही रेषा ओलांडत नाही.


### प्रगत- कठिण



### सोपे



### मध्यम



## शब्दशोध


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऐ | हृ | मा | से | म | र | गा | ली | ल | आ | उ | वि |
| सं | उ | गा | ये | शू | हृ | ऐ | सं | उ | हृ | ऐ | म |
| आ | म | सां | वि | पु | वि | गा | सां | दे | का | गा | हृ |
| मं | वि | आ | सं | उ | र | आ | गा | आ | दे | पु | द |
| त्र | र | हृ | प | च्छि | वि | म | वि | पे | उ | हृ | य |
| ण | म | दे | उ | श्वा | सं | पु | त्र | गा | र | ऐ | आ |
| ऐ | श | आ | स | गा | उ | दे | हृ | आ | वि | दे | उ |
| रो | सं | म | सां | हृ | पु | आ | सां | सं | हृ | श्वा | म |
| म | उ | वि | गा | रु | र | दे | वि | हृ | आ | सं | स |
| वि | ऐ | पु | ष | सं | म | पु | र | दे | हृ | म | गा |
| बो | आ | सं | बं | ध | उ | हृ | ऐ | म | पु | जा | ऐ |
| वि | ट | उ | सां | वि | म | च्छि | मा | र | उ | ळे | सं |

ऐका
विश्वास
उपदेश
सांगा
मासे
पुरुष
मच्छिमार
आमंत्रण
विश्वास
बोट
हृदय
संबंध
जाळे
पेत्र
येशू
रोम
गालील

समान असलेल्या **2** वर वर्तुळ करा.



समान असलेल्या **2** वर वर्तुळ करा.



# घरगुती मातीसह पवित्र शास्त्र उजळणी

चला पवित्र शास्त्रातील आपल्या गोष्टीसाठी माती  काढू या!

एका दिवशी, येशू गालील समुद्राजवळ उभा होता, आणि देवाचे वचन ऐकण्यासाठी त्याच्या भोवती एक जमाव गोळा झाला होता. (खेळण्याच्या मातीने लोकांचा जमाव तयार करा) जशी गर्दी मोठी झाली, येशूला खात्री करायची होती की सर्वजण त्याचे ऐकू शकतील. तो पेत्राच्या बोटीवर चढला आणि तिला थोडे बाहेर काढले. मग तो खाली बसला आणि त्यांना बोटीतून शिकवू लागला. (तुमच्या खेळण्याच्या मातीने बोट आणि काही लाटा तयार करा.)

जेव्हा येशूने शिकविणे संपविले, तेव्हा त्याने पेत्राला आत येउन त्याच्या बरोबर मासे पकडण्यासाठी जाण्यास सांगितले. पेत्राने पूर्ण रात्र काम केले होते परंतू तो तरीही बोटीत चढला. जेव्हा मासेमारांनी (पेत्रानेही) त्यांचे जाळे खाली टाकले, तेव्हा ते जास्तीत ज्यास्त भरले आणि जाळी तुटु लागली! पेत्र, याकोब आणि योहान त्यांनी पकडलेले मासे पाहून आश्चर्यचकीत झाले. (आता तुमच्या मातीने काही मासे तयार करा.)


पेत्र गुडघ्यावर झाला आणि म्हणाला,"प्रभू माझ्या पासून दूर जा, मी पापी मनुष्य आहे!" त्यांना तिथेच सोडण्याऐवजी येशू त्यांना म्हणाला, "घाबरू नका; आता पासून तुम्ही माणसे धरणारे व्हाल." (आता तुमच्या मातीने काही लोक तयार करा.)

(मुलांकडून माती गोळा करा)



# खेळ पाठांतर वचन वेळ

मुलांना पाठांतर वचन दर्शविण्यासाठी मागोमाग रंगेत उभे करा! ते एकमेकांपासून दूर जात असतांना पाऊलं मोजतात, आणि मग एकमेकांकडे तोंड करून गोळी मारतात (वचन म्हणतात) जो विद्यार्थी सर्वात आधी वचन बोलेल तो विजेता ठरेल.




फुगा फोडणे खेळाने सर्व पाठांतर वचनांची पुनरावृत्ती करा. फुग्यावर वचनाचा संदर्भ लिहा. विद्यार्थ्यांना संघात विभागा. प्रत्येक संघ भितींवर लावलेल्या फुग्याकडे एक विद्यार्थी पाठवतो आणि तो संदर्भ वाचतो. संघ एकत्र वचन बोलतो आणि विद्यार्थी त्यांनी म्हटलेले वचन बरोबर आहे की नाही हे पाहण्यासाठी फुगा फोडतो. फुग्याच्या खाली वचन असलेला कागदाचा तुकडा राहिल.

# फराळ भेळ



**साहित्य:**

मुरमुरा ४ वाट्या फुटाणे
१ वाटी भाजलेले शेंगदाणे
४ टेबलस्पून कांदा बारीक चिरलेला
४ टेबलस्पून टोमॅटो बारीक चिरलेला
४ टेबलस्पून मीठ चवीनुसार चाट मसाला
२ चमचे इम्ली सॉस
२ टेबलस्पून लिंबूचा रस
१ चमचा चिरून घ्या.

**कृती**

1. एका वाडग्यात मुरमुरे, फुटाणे, शेंगदाणे, कांदे, टोमॅटो, मीठ, चाट मसाला, इम्ली सॉस, लिंबाचा रस एकत्र मिक्स करा.
2. कागदाने बनवलेल्या शंकूमध्ये भेळ, वर कोथिंबीर आणि शेव टाकून सर्व्ह करा.


# हस्तकला राजेशाही मुकुट

**साहित्य:**





मुकुट नमुनाची छापलेली प्रत (प्रत्येक विद्यार्थ्याला तीन मुकुटांचे तुकडे आवश्यक आहेत.) जेव्हा तुम्ही विभाग छापाल: "मी राजाचे मूल आहे"
तेव्हा तुमच्याकडे दोन विद्यार्थ्यांसाठी पुरेसे असेल.
-कात्री -डिंक किंवा टेप
- रंगीत पेन, रंगकांड्या किंवा रंगीत पेन्सिल
सूचना:
पायरी 1. मुकुट रंगवा आणि तुमच्याकडे असलेल्या कोणत्याही साहित्याने सजवा (स्टिकर्स, ग्लिटर, मणी किंवा थोडे प्लास्टिकचे नग, जर तुमच्याकडे असतील तर).
पायरी 2. बिंदू रेषांवर मुकुट कापून टाका.
पायरी 3. टेप किंवा डिंकाने टॅब वर चिटकवा. तुमचा सुंदर मुकुट तयार आहे.

# हस्तकला 5 - राजेशाही मुकुट



# हस्तकला 5 - राजेशाही मुकुट



# खेळ वेळ

मुलांनी हालचाल करणे आणि त्यांची वळवळ काढणे आवश्यक आहे. खेळ त्यांना एकत्र येण्यास, स्पर्धा करण्यास आणि मजा करण्यास मदत करतात आणि ते बंद होण्याच्या वेळी विश्रांती घेत असताना त्यांना हलविण्याची आणि ऐकण्याची संधी प्रदान करतात. शेवटच्या वेळेस  घोषित करण्यासाठी नेत्याला जिंकलेल्या संघाला गुण देणे लक्षात ठेवा.

## दिवस 1खेळाची वेळ

### हळू हळू पाणी बाटली चाला

आपल्याला आवश्यक असेल:

- पाण्याने भरलेल्या 6 प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या
- डोळ्याला बांधण्यासाठी कापड
- धुण्यायोग्य मार्कर किंवा खडू

सूचना:

1. जमिनीवर धुण्यायोग्य मार्कर किंवा खडू वापरून सरळ रेषा आणि प्रारंभ आणि समाप्ती बिंदू चिन्हांकित करा.
2. भरलेल्या पाण्याच्या बाटल्या रेषेवर ठेवा.
3. एका मुलाच्या डोळ्यावर कापड बांधा.
4. प्रत्येक आंधळ्या मुलाने बाटल्या न पाडता सुरुवातीपासून शेवटपर्यंत सरळ रेषेत पायाचे बोट टिपणे आवश्यक आहे.
5. जर मुलाने बाटली पाडली तर तो खेळाच्या बाहेर आहे.
6. जो मुलगा बाटल्या न पाडता पूर्ण करतो तो विजेता आहे.





हे एक आवडते स्थानक असेल ज्यामध्ये दररोज भरपूर मनोरंजनासाठी खेळ असतात. प्रत्येक दिवसाच्या समारोप समारंभात घोषणा करण्यासाठी प्रत्येक रोटेशन दरम्यान कोणता रंग बंडाना किंवा रिबन जिंकला याची नोंद ठेवण्यास विसरू नका. मजा करा!

# दिवस 2 खेळाची वेळ

### चार चाकी गाडी शर्यत

मुलांना त्यांच्या रंगाच्या संघामध्ये विभागा आणि त्यांना जोडीदार निवडू द्या. एका मुलाला जमीनीवर त्याच्या पोटावर झोपायला सांगा जेव्हा दुसरे मुल त्याचे घोटे पकडून हवेत पाय उचलायला सांगा. (ही चार चाकी घोडागाडी आहे.) मुलांच्या जोडया एकमेकांबरोबर शेवटच्या रेषे पर्यंत शर्यत करतात.

## दिवस 2 साठी पुरवठा

- केळी, दोरी, सुरवात आणि समाप्ती ओळी चिन्हांकित करण्यासाठी दोरी ,
- टेप किंवा मातीत काढलेल्या ओळी



### केळी ऑलंपिक आत किंवा बाहेर (रिले रेस)

तुमच्या वर्गाला त्यांच्या रंगाच्या संघात विभागा. त्यांना प्रत्येकी एक केळी द्या. खाली दिलेल्या कल्पनांचा उपयोग करीत त्यातील एक किंवा पूर्ण वापरा.

1. केळी गुडघ्याच्या मध्ये ठेवा आणि शेवटच्या रेषे पर्यंत जा आणि परत या.
2. दोन संघ केळी झेलत शेवटच्या रेषे पर्यंत जातात व परत येतात.
3. मुले केळी त्यांच्या काखेत ठेवतात आणि एका पायावर खाली व वर जातात एका वेळी एक व्यक्ति.
4. प्रत्येक खेळाडूच्या कमरेला केळी बांधलेली असते. केळीचा उपयोग शेवट रेषे पर्यंत चेंडू नेण्यासाठी करा

# दिवस 3 खेळाची वेळ

### रस्सी खेच

ह्या खेळासाठी तुम्हाला जाड दोरीची गरज आहे ज्याते प्रत्येक टोकाला एक मोठी गाठ बांधलेली आहे. दोरी इतकी जाड असावी की तीने मुलांचे हात जाळणार नाही. मुलांना त्यांच्या रंगाच्या संघात विभागा. एका संघाला ओळीत उभे राहून दोरीचे एक टोक पकडू द्या; दुस-या संघाला दुस-या टोकावर तसेचे करू द्या. दोरीचा मध्य भाग मातीवर रेष काढून आखा. मुलांना संघ म्हणून दोरी ओढायला आणि दुस-या संघाला मधल्या रेषेच्या पलिकडे ओढायला लावा. दुस-या दोन संघासह रस्सी खेच पुन्हा खेळा. मग दोन जिंकणा-या संघांना एकमेकांविरूध्द खेळू द्या.



## दिवस 3 साठी साहित्य

- Balloons
- Tape
- Sharp pin
- Thick rope
- String or a line in the dirt marking the middle, finish lines, or starting ling
- Long rag to tie legs together

### तीन पायाची शर्यत

मुलांना त्यांच्या रंगाच्या संघात विभागा आणि जोडीदार निवडू द्या. जोडीदार आजू बाजूला उभे राहतात. मोठा कापडाचा तुकडा घेउन त्यांचे पाय एकत्र बांधा. त्यांना त्यांच्या "तीन" पायावर शेवटच्या रेषे पर्यंत धावायचे आहे. जो संघ प्रथम पोहचेल तो विजेता ठरेल!



# दिवस 4 खेळाची वेळ

## वाड्यात पात्र ठेवा खेळ

तुम्ही 2 किंवा अधिक संघ बनवू शकता. एका कागदावर वाड्याचे मोठे चित्र काढा आणि मध्यभागी एक मोठा दरवाजा काढा, तसेच चोर पोलिसातील राजा किंवा एखादे पात्र काढा आणि ते कापा. मुलांना रांगेत उभे करा. प्रत्येक मुलाच्या, डोळ्यांवर पट्टी बांधा, चोर पोलिसांच्या पाठीवर टेप लावा आणि मुलाला गोल फिरवा. मग त्याला वाड्याच्या गेटच्या दिशेने दाखवा आणि त्याला पात्र गेटमध्ये ठेवण्यास सांगा. दाराच्या आत असलेला जिंकतो. वैकल्पिकरित्या, टीम सदस्य डोळ्यावर पट्टी बांधलेल्या मुलाला "वर, खाली, डावीकडे, उजवीकडे, परिपूर्ण!" असे संकेत देऊ शकतात.

### दिवस 4 साठी साहित्य

- राजवाड्याचे चित्र किंवा रंगवलेला कागदी राजवाडा
- कागदाचा मुख्य इंस्पेटर आणि चोर
- डोळ्याला बांधण्यासाठी पट्टी
- टेप



# दिवस 5 खेळाची वेळ

## नॉनडी/स्टेपू/हॉपस्कॉच

मुलांना रंगीत संघांमध्ये विभाजित करा आणि त्यांना रांगेत उभे करा. खेळात जमिनीवर ग्रिड काढणे आणि त्यावर क्रमांक देणे समाविष्ट आहे. पाठांतर वचनातील शब्दां एवढे चौरस बनवा. खेळाडू आळीपाळीने आणि एखादी वस्तू, सामान्यतः एक लहान दगड, क्रमांकित डब्यावरवर फेकतात. सीमारेषेवर पाऊल ठेवू नये याची काळजी घेत, लॅप पूर्ण करण्यासाठी एक/दोन पायांवर उडी मारत वस्तू उचलण्यासाठी त्यांना डबा ओलांडून जावे लागते. त्यांनी प्रत्येक हॉपसाठी वाचनाचे शब्द बोलले पाहिजेत. जोपर्यंत एका संघाने प्रत्येक सदस्याने उडी मारत वचन बोलले नाही तोपर्यंत पुढे जा.

### दिवस 5 साठी साहित्य

- चॉक, लहान दगड
- दोरी, खुर्ची, किंवा सुरवात व शेवट रेषा दाखविण्यासाठी मातीतील रेषा
- दोन रंगाचे फुगे
- चार झाडू किंवा वाटर नुडल ( ओढल्या गेले तर मऊ टोक असलेले खांब)

## चोर पकडा

गटाला त्यांच्या रंगाच्या संघात विभागा. प्रत्येक संघासाठी तुम्हाला दोन झाडू किंवा पाणी नूडल आणि सहा फुगे, तीन एका रंगाचे आणि तीन दुस-या रंगाचे लागतील. खोलीच्या दुस-या टोकाला दोन खुर्च्या ठेवा. प्रत्येक संघाच्या सभासदाला झाडण्यासाठी झाडूचा उपयोग करून फुगे चोर "गोळा" करून खोलीच्या दुस-या बाजूला, खूर्चीच्या भोवती आणि संघाच्या पुढील सभासदाकडे न्यायचा आहे. जर काही फुगे फुटले तर काही अधिक फुगे हाताशी असू द्या!



# अधिक खेळ



## पोत्यांची शर्यत

जर तुम्ही मोठे पोते जसे पीठाचे, बटाटयाचे इ.(शोधले तर पोत्यांची शर्यत खूप मजेदार आहे.)



## फुगे तुडविणे

तुमच्या खेळण्याचा भाग फुग्यांनी भरा. नंतर मुलांना पायाने फुगे फोडण्यासाठी सोडा. फुगे फुगविण्याआधी फुग्याच्या आत तारे स्टीकर, किंवा टॅटू भरा. एकदा तुडविणे संपले की मुलं परत जाऊन त्यांचे बक्षीस घेऊ शकतात.

## पायाचा फुगा फोडणे

प्रत्येक मुलांच्या पायाला एक फुगा बांधा. त्यांचे ध्येय हे आहे की स्वतःचा फुगा फुटू न देता दुस-याच्या पायाचा फुगा फोडणे. ज्याच्या/ जिच्या पायाला अजूनही फुगा आहे तो विजेता असेल.



## रिंगमध्ये पोलिसची टोपी

जमीनीवर हूलाहूप रिंग ठेवा. तुमच्या मुलांना रेषेच्या मागे ओळीत उभे करा आणि त्यांची टोपी रिंग मध्ये टाकायला सांगा. (किंवा खेळासाठी काही टोप्या उपलब्ध करा.) जे खेळाडू हूलाहूपच्या आत पोलिस टोपी टाकतील त्यांना बक्षीस द्या. तुम्ही बैलाचा मोठा डोळा निशाणा म्हणून गवतावर काढू शकता आणि ज्या खेळाडूची टोपी डोळयाच्या सर्वात जवळ पडेल तो खेळ जिंकेल.





# Equip & Grow

“चोर पोलिस” हे साहित्य मुले महत्वपूर्ण आहेत - “Equip & Grow” द्वारे तयार व उत्पादित आहे. सर्व हक्क स्वाधीन.
आम्ही तुमच्या सेवेच्या गरजांसाठी किंवा इतर सेवांना आशीर्वाद देण्यासाठी प्रती तयार करण्याची परवानगी देतो.
अधिक माहितीसाठी, आमच्याशी संपर्क साधा
Info@ChildrenAreImportant.com
सर्व पवित्र शास्त्र एन आय वी  मधून घेतले.
संपूर्ण क्रिएटिव्ह टीमचे खूप खूप आभार!
संपादक: Kristina Krauss
क्रिएटिव्ह टीम:  Blessy Jacob, Anupama Wankhede, Angie Kangas, Areli Salinas, Benjamín Gaxiola, Dwight Krauss, Jan Krauss, Jennifer Sanchez, Jon Kangas, Julio Sanchez, Mary Amelia Hernández, Mike Kangas, Vickie Kangas, Rubén Dario, Suki Kangas, and Verónica Toj.